




संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा








रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, गुरुवार दि. १८.०६.२०२६ | अंक नं. ०६७ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020










# पालकमंत्री यांच्या पत्रालाही आयुक्तांकडून ‘केराची टोपली’

**गंज बाजार, सराफ बाजारातील अतिक्रमण ‘जैसे थे’**

नगर - शहराची मुख्य बाजारपेठ असलेल्या गंज बाजार आणि सराफ बाजार परिसरात दिवसेंदिवस वाढणाऱ्या अतिक्रमणामुळे व्यापारी आणि नागरिक त्रस्त झाले आहेत. या समस्येकडे लक्ष वेधण्यासाठी सराफ बाजार असोसिएशनने थेट पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे धाव घेतली होती. पालकमंत्र्यांनी या तक्रारीची दखल घेत त्वरित कारवाई करण्याचे आदेश महापालिका आयुक्तांना दिले होते. मात्र, पालकमंत्र्यांच्या या पत्राला आयुक्तांनी अक्षरशः ‘केराची टोपली’ दाखवल्याचा प्रकार समोर आला आहे. पालकमंत्र्यांच्या पत्राला आठ दिवस उलटूनही महापालिका प्रशासनाकडून अतिक्रमणधारकांवर कोणतीही ठोस कारवाई करण्यात आलेली नाही. उलट, या कालावधीत अतिक्रमणांचे स्वरूप अधिकच भयावह झाले आहे.

या संदर्भात सराफ बाजार असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांनी महापालिका आयुक्तांना भेटून विचारणा केली असता, त्यांना केवळ उडवाउडवीची उत्तरे देण्यात आली. विशेष म्हणजे, अतिक्रमण विभागाचे अधिकारी यांनी तर अत्यंत बेजबाबदारपणाचा कळस गाठला. मी सध्या बाहेर आहे, कार्यालयात गेल्यावर पाहतो, मला याबाबत काहीही माहिती नाही, अशी मखलाशी करत त्यांनी आपल्या जबाबदारीतून हात झटकले. एका जबाबदार मंत्र्यांच्या पत्राला जर महापालिका प्रशासन इतक्या सहजपणे डावलत असेल, तर सामान्य नागरिकांच्या तक्रारींकडे हे प्रशासन किती गांभीर्याने पाहत असेल, हा प्रश्न आता शहरवासियांना पडला आहे.

शहराच्या मुख्य बाजारपेठेत सुरू असलेल्या या मनमानी कारभारामुळे व्यापाऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होत आहे. पालकमंत्र्यांच्या आदेशाची अशी पायमल्ली करणारा हा प्रकार प्रशासनाच्या निष्क्रियतेचा पुरावा ठरत आहे. आता या प्रकरणात पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील लक्ष घालून महापालिका आयुक्तांवर आणि संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती ठोस कारवाई करणार, याकडे संपूर्ण शहराचे लक्ष लागले आहे. केवळ पत्रांची देवाणघेवाण न होता, प्रत्यक्ष अतिक्रमण हटाव मोहीम राबवली जाणार का, असा सवाल उपस्थित केला जात आहे.






# शहरातील फ्लेक्सवर महापालिकेची कारवाई




नगर - शहराच्या विविध भागांत विनापरवाना लावण्यात आलेले शेकडो फ्लेक्स आणि बॅनर्स महापालिकेच्या अतिक्रमण निर्मूलन पथकाने १८ जून रोजी काढले असून, ते जप्त करण्यात आले आहेत.

गेल्या काही काळापासून शहरातील पदपथ, खांब आणि सार्वजनिक भिंतींवर अनधिकृत फ्लेक्सचा सुळसुळाट झाला होता. राजकीय पोस्टर्स, हॉटेल, शाळा महाविद्यालयांच्या जाहिराती आणि विविध फलकांमुळे शहराच्या सौंदर्याचे विद्रुपीकरण होत असल्याचे चित्र सर्वत्र दिसत होते. नागरिक आणि स्वयंसेवी संस्थांकडून या विरोधात वारंवार तक्रारी करण्यात येत होत्या. विनापरवाना लावलेल्या या फ्लेक्समुळे रस्ते आणि चौकांचे विद्रुपीकरण होण्यासह सौंदर्याला बाधा येत होती. त्यामुळे तक्रारी दाखल झाल्यानंतर संबंधितांवर कारवाईचा बडगा उगारण्यात आला.

रस्त्याकडेला लावलेले फ्लेक्स आणि बॅनर्स पावसाळ्यात जोरदार वाऱ्यामुळे पडून अपघात होण्याचा धोका वाढत आहे. रस्त्यांवर जाणाऱ्या वाहनांवर हे फ्लेक्स आणि बॅनर्स पडले तर मोठा अपघातही होऊ शकतो. हा संभाव्य धोका टाळण्यासाठी अशा फ्लेक्स आणि बॅनर्सवर कारवाईची मागणी होत होती. नागरिकांच्या सुरक्षेचा आणि सार्वजनिक हिताचा विचार करून महापालिकेने तातडीने ही कारवाई करण्याचे निर्देश देत शहरातील बाजारपेठ, सावेडी परिसर, दिल्ली गेट आणि अहिल्यानगर-छत्रपती संभाजीनगर महामार्ग अशा विविध ठिकाणांहून विनापरवाना लावलेले फलक काढून महापालिकेच्या पथकाने हे सर्व फ्लेक्स आणि बॅनर्स जप्त केले.

ज्यांनी विनापरवाना फ्लेक्स लावले आहेत, त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्यात येणार आहे. शहर स्वच्छ आणि सुरक्षित ठेवण्यासाठी नागरिकांनीही सहकार्य करावे आणि विनापरवाना फ्लेक्स लावणे टाळावे, असे आवाहन महापालिकेच्यावतीने करण्यात आले.


**पाहिजेत**

सोनचाफा ज्वेलरी शोरुमकरिता सेल्सगर्ल्स पाहिजे

(आकर्षक पगार)

भेटा : कोहिनूर समोर, कापडबाजार, अहिल्यानगर

9356352421

**अर्जंट पाहिजेत**

अहिल्यानगरमधील हॉस्पिटलमध्ये हाऊसकिपींगसाठी

स्त्री/पुरुष : ३०

जागासाठी भरती चालू.

ड्युटी १२ तास, २६ दिवस ड्युटी

PF, ESIC सुविधा

संपर्क : सौ.सुनीता चौहान मॅडम

7517575310



जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन–२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# बनावट स्वाक्षऱ्यांच्या आधारे ८८ लाखांची फसवणूक

### नगरमध्ये तीन भागीदारांवर गुन्हा दाखल

नगर – बनावट कागदपत्रे आणि खोट्या स्वाक्षऱ्यांच्या आधारे एका व्यक्तिची तब्बल ८८ लाख रुपयांची आर्थिक फसवणूक करण्यात आली असून, या प्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात तीन आरोपींविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

रमेश हौशिनाथ पोखरकर (वय ५०, रा. मुंबई) यांनी याप्रकरणी पोलिसांत फिर्याद दिली आहे. फिर्यादी पोखरकर यांची आरोपी अतुल अरुण नलावडे याच्याशी व्यावसायिक ओळख झाली होती. आरोपींनी फिर्यादी यांच्या नकळत त्यांच्या बनावट स्वाक्षऱ्या करून युनायटेड एंटरप्रायजेस नावाची एक खोटी भागीदारी संस्था अहिल्यानगर येथे स्थापन केली. या संस्थेमध्ये पोखरकर यांना २५ टक्के भागीदारी असल्याचे कागदपत्रांवर दाखवले गेले.

या बनावट पत्राच्या आधारे आरोपी विकास दशरथ पानसंबळ, अतुल नलावडे आणि धीरज बालाजी तनपुरे यांनी बँकेत चालू खाते उघडले. त्यानंतर फिर्यादींची कोणतीही संमती न घेता, आरोपींनी त्यांच्या नावे व्यावसायिक वाहनासाठी बँकेकडून ८८ लाख रुपयांचे कर्ज काढून फसवणूक केली. हा फसवणुकीचा प्रकार समोर आल्यानंतर पोखरकर यांनी पोलीस ठाण्यात धाव घेतली. पोलिसांनी तिन्ही आरोपींविरुद्ध गुन्हा नोंदवला असून, या प्रकरणाचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक कल्पना चव्हाण करत आहेत.

ऐतिहासिक आप्पु हत्ती चौकात

# लहुजी वस्ताद साळवे यांचाच पुतळा उभारणार

### सकल मातंग समाजाचा 'एल्गार'

नगर – शहरातील ऐतिहासिक आप्पुहत्ती चौकात आद्य क्रांतिगुरू लहुजी वस्ताद साळवे यांचाच अश्वारूढ पुतळा उभारला जावा, या मागणीसाठी सकल मातंग समाजाने आक्रमक पवित्रा घेतला आहे. महापालिका प्रशासनाच्या जाणीवपूर्वक दुर्लक्ष आणि मनमानी कारभाराच्या निषेधार्थ समाजाने आता थेट 'एल्गार आंदोलन' पुकारले असून, या मागणीवर समाज ठाम आहे. आंदोलनाची पुढील दिशा ठरवण्यासाठी १६ जून रोजी सिद्धार्थनगर येथे सुनील भोसले यांच्या अध्यक्षतेखाली बैठक पार पडली. बैठकीच्या सुरुवातीला आद्य क्रांतिगुरू लहुजी वस्ताद साळवे आणि साहित्यरत्न लोकशाहीर डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.



शहरातील ऐतिहासिक आप्पु हत्ती चौकात आद्य क्रांतिगुरू लहुजी वस्ताद साळवे यांचाच अश्वारूढ पुतळा उभारला जावा, या मागणीसाठी सकल मातंग समाजाने आक्रमक पवित्रा घेत लोकशाहीर डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

या बैठकीत महापालिकेच्या प्रशासकीय मुजोरीचा तीव्र शब्दांत समाचार घेण्यात आला. रस्ता दुरुस्तीच्या नावाखाली ऐतिहासिक 'आप्पु हत्ती' हटवून तिथे घोडा लावण्याच्या निर्णयावर तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली. तसेच, महापालिकेला जाहिरातीच्या माध्यमातून लाखो रुपयांचे उत्पन्न मिळवून देणारा हा चौक एका रात्रीत खासगी संस्थेच्या घशात घातल्याने मनपाचे मोठे आर्थिक नुकसान झाल्याचा आरोप करण्यात आला. दलित वस्ती सुधार योजनेचा कोट्यवधी रुपयांचा निधी सुशोभीकरणाच्या नावाखाली एका खासगी संस्थेसाठी खर्च करून दलित समाजाला अंधारात ठेवल्याचा गंभीर ठपकाही प्रशासनावर ठेवण्यात आला. येणाऱ्या महासभेत संबंधित खासगी संस्थेचा ठेका तातडीने रद्द करून त्याच ठिकाणी लहुजी वस्ताद साळवे यांचा पुतळा उभारण्याचा ठराव मंजूर करावा, अशी स्पष्ट मागणी करण्यात आली आहे. ही जबाबदारी संबंधित नगरसेवकांवर सोपवण्यात आली असून, सर्व नगरसेवकांनी एकत्रितपणे ही प्रशासकीय लढाई लढण्याचे आश्वासन दिले आहे.

या बैठकीला प्रभाग क्र. ५ चे नगरसेवक मोहित पंजाबी, जय भोसले, जितू गंभीर, सोमनाथ जाधव, बाबासाहेब साठे, प्रा. संजय लोखंडे, प्रा. विशाल पाचारणे, रंजित वैरागर, लक्ष्मण शिंदे, राहुल शेकटकर, जालिंदर शेलार, संतोष ठोकळ, संदीप पठारे, विजय वडागळे, गणेश शिंदे, दिनेश वैराळ, अश्विन सोनवणे, सागर अडागळे, बंटी भोसले, राजू भिसे, विठ्ठल उमाप आणि सुनील वैराळ आदी उपस्थित होते

# दारुसाठी पैसे न दिल्याने अभियंत्यावर कुऱ्हाडीने हल्ला

### बोल्हेगावात घडलेली घटना

नगर – दारू पिण्यासाठी पैसे न दिल्याच्या रागातून एका अभियंत्यावर ५ जणांनी कुऱ्हाडीने हल्ला करुन त्यास गंभीर जखमी केल्याची घटना बोल्हेगाव परिसरातील नायरा पेट्रोल पंपाजवळ घडली आहे. या हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या इंजिनिअरवर शहरातील एका खासगी रुग्णालयात अतिदक्षता विभागात उपचार सुरु आहेत. याप्रकरणी पोलिसांनी रुग्णालयात जाऊन जखमीचा जबाब नोंदवला असून पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

सुबोध संजय फुंदे (वय ३२, रा. सूर्यनगर, अहिल्यानगर) असे या गंभीर जखमी झालेल्या अभियंत्याचे नाव आहे. त्यांनी दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे, सुबोध फुंदे हे व्यवसायाने अभियंता (इंजिनिअर) असून नगर शहर आणि सावेडी परिसरात त्यांच्या बांधकामाच्या साईट्स सुरू आहेत. मंगळवारी लेबर लोकांचा पगाराचा दिवस असल्याने त्यांनी सर्व ठिकाणचे पगार दिले. मात्र, बोल्हेगाव रस्त्यावरील नायरा पेट्रोल पंपाच्या साईटवरील वॉचमनचा पगार द्यायचा राहिल्याने फुंदे रात्री साडेअकरा वाजेच्या सुमारास तिथे गेले होते. त्यांनी तेथील वॉचमन दिलीप चंद्रभान पवार यांना बोलावून त्यांच्या पगाराची रोख रक्कम दिली. त्यावेळी तिथे वॉचमनचे काही नातेवाईक आलेले होते. त्यातील एकाने फुंदे यांच्याकडे दारू पिण्यासाठी पाचशे रुपयांची मागणी केली. तुम्ही माझ्याकडे कामाला नाही, मी तुम्हाला पैसे का देऊ? असे फुंदे यांनी विचारले. या गोष्टीचा राग आल्याने संबंधितांनी फुंदे यांना शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. त्यानंतर आरोपी सागर गोरख मांजरे याने सुबोध फुंदे यांच्या डोक्यात कुऱ्हाड मारली. कुऱ्हाड लागल्याने फुंदे रक्ताच्या थारोळ्यात जमिनीवर पडले. फुंदे खाली पडल्यानंतर आरोपी मनोज गोरख मांजरे, करण पवार आणि इतर दोन अनोळखी इसमांनी त्यांना लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण करण्यास सुरुवात केली. मारहाणीदरम्यान करण पवार याने मारलेला दगड फुंदे यांच्या डाव्या बाजूच्या बरगडीला लागल्याने ते गंभीर जखमी झाले. वॉचमन दिलीप पवार यांनी मध्यस्थी करत सुबोध फुंदे यांना आरोपींच्या तावडीतून वाचवले व दवाखान्यात पोहोचवले. सहाय्यक फौजदार थोरवे पुढील तपास करत आहेत.

# सोशल मीडियावर लहान मुलांचे आक्षेपार्ह व्हिडिओ पसरवणाऱ्यावर सायबर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल

नगर – सोशल मीडियाचा गैरवापर करून लहान मुलांचे अत्यंत आक्षेपार्ह आणि शोषण करणारे व्हिडिओ इंटरनेटवर प्रसिद्ध केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी सायबर पोलीस ठाण्यात एका इन्स्टाग्राम आयडीवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सायबर हेल्पलाईन विभागाकडून पोलिसांना लहान मुलांच्या शोषणाशी संबंधित व्हिडिओ इंटरनेटवर पसरवले जात असल्याची गोपनीय माहिती मिळाली होती. या माहितीच्या आधारे सायबर पोलीस ठाण्याचे पोलीस अंमलदार रावसाहेब रोहिदास हुसळे यांनी तांत्रिक तपास केला असता एका इंस्टाग्राम आणि मेसेंजर खात्यावरून हे आक्षेपार्ह व्हिडिओ मोठ्या प्रमाणावर प्रसिद्ध केले जात असल्याचे समोर आले. संबंधित आरोपी आपल्या खात्यावरून लहान मुलांचे चुकीचे चित्रीकरण करून ते व्हिडिओ समाजमाध्यमांवर प्रसारित करत असल्याचे तांत्रिक तपासात स्पष्ट झाले. त्यानंतर हुसळे यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन सायबर पोलीस ठाण्यात आरोपीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सायबर पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सागर ढिकले हे पुढील तपास करत आहेत. इंटरनेट आणि सोशल मीडियाचा वापर करताना नागरिकांनी विशेषतः मुलांच्या सुरक्षेबाबत सतर्क राहावे, असे आवाहन सायबर पोलिसांच्या वतीने करण्यात आले आहे.

# लग्नाचे आमिष दाखवून तरुणीचा मानसिक छळ, गुन्हा दाखल

नगर – सोशल मीडिया आणि फोनवरून ओळख वाढवून एका तरुणीला लग्नाचे आमिष दाखवत तिचे नग्न फोटो मागवून मानसिक छळ व फसवणूक केल्याप्रकरणी नगरमधील एका तरुणाविरोधात तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, तेलंगणा येथील रहिवासी असलेल्या एका पीडित तरुणीला मार्च २०२४ मध्ये एका अज्ञात नंबरवरून फोन आला होता. फोन करणाऱ्या सारसनगर येथील रहिवासी युवकाने आयटी कंपनीच्या प्रोजेक्टच्या बहाण्याने तरुणीशी ओळख वाढवली. पुढे या ओळखीचे रूपांतर मैत्रीत झाले. यादरम्यान संशयित आरोपीने तरुणीला लग्नाचे खोटे आश्वासन दिले. या विश्वासाचा फायदा घेत त्याने व्हिडिओ कॉलवर अश्लील संभाषण करणे आणि पीडितेकडे नग्न फोटोंची मागणी करत मानसिक दबाव टाकण्यास सुरुवात केली.

पीडित तरुणीने फोटो देण्यास नकार दिला असता, आरोपीने तिच्याशी वाद घालून संपर्क तोडला. दरम्यान, आरोपीचा शोध घेत तरुणी अहिल्यानगर येथे आली. तेथे तिला समजले की आरोपीचा २४ जून रोजी लोणावळा येथे विवाह ठरला आहे. आरोपीच्या कुटुंबीयांनीही तरुणीला अपमानास्पद वागणूक दिली. अखेर फसवणूक झाल्याचे लक्षात येताच पीडितेने तोफखाना पोलीस ठाण्यात तक्रार दिली. या प्रकरणी पोलिसांनी गुन्हा नोंद केला असून पुढील कायदेशीर कारवाईसाठी हे प्रकरण तेलंगणा येथील सुभेदारी पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आले आहे.

# सीना नदीपात्रातील अतिक्रमण हटविण्याच्या मागणीसाठी नेप्ती ग्रामस्थांचा नगर–कल्याण महामार्गावर रास्ता रोको

नगर – नगर तालुक्यातील नेप्ती येथील चांदपीर वस्ती जामगाव नाला–सीना नदीपात्रात करण्यात आलेले कथित अतिक्रमण तात्काळ हटविण्यात यावे, नदीपात्रात टाकलेली भर व अनधिकृत पुल (बंधारा) काढण्यात यावा या मागणीसाठी नेप्ती ग्रामस्थांनी १८ जून रोजी सकाळी ९ वाजता नगर – कल्याण महामार्गावरील छत्रपती कॉलेज परिसरात रास्ता रोको आंदोलन केले.

ग्रामस्थांनी तहसील कार्यालयाकडे दिलेल्या निवेदनात म्हटले आहे, चांदपीर वस्ती परिसरातील सीना नदीपात्रात काही व्यक्तींनी अतिक्रमण करून पाण्याचा नैसर्गिक प्रवाह अडविला आहे. त्यामुळे पावसाळ्यात नदीला पाणी आल्यानंतर शेजारील शेतजमिनींचे म ोठ्या प्रमाणात नुकसान होण्याची भीती व्यक्त करण्यात आली होती. या संदर्भात नेप्ती मंडळ अधिकाऱ्यांनी घटनास्थळी पाहणी करून पंचनामा सादर केला. पंचनाम्यानुसार जामगाव नाल्याच्या पश्चिमेकडून पूर्वेकडे वाहणाऱ्या प्रवाहाच्या उत्तर बाजूस नदीपात्रात भर टाकण्यात आल्याचे दिसून आले. ही भर नदीपात्रातील माती व रॅबिट वापरून करण्यात आली असून तिचे प्रमाण सुमारे १६० ब्रास असल्याचे प्रथमदर्शनी आढळून आले.



सीना नदीपात्रातील अतिक्रमण हटविण्याच्या मागणीसाठी रास्ता रोको करताना नेप्ती ग्रामस्थ.

संबंधित पुलाच्या बांधकामामुळे सीना नदीचा नैसर्गिक प्रवाह अडला आहे. मुसळधार पाऊस झाल्यास हजारो हेक्टर शेती पाण्याखाली जाण्याची भीती आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे लाखो रुपयांचे नुकसान होऊ शकते. पावसाळा सुरू झाल्याने कधीही नदीला पूर येण्याची शक्यता आहे. प्रशासनाने कोणतीही दुर्घटना घडण्यापूर्वी तात्काळ दखल घेऊन अतिक्रमण व अनधिकृत पुल हटवावे, अशी मागणी ग्रामस्थांनी केली.

प्रकरणाची गंभीरता लक्षात घेऊन तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी अभिजीत वांढेकर यांनी संबंधित गटाची मोजणी करण्यासाठी उपअधीक्षक भूमी अभिलेख कार्यालयास निर्देश दिले आहेत.

आंदोलनस्थळी तहसीलदार अभिजीत वांढेकर यांनी ग्रामस्थांशी चर्चा करून भूमी अभिलेख विभागामार्फत आठ दिवसांच्या आत मोजणी पूर्ण करण्यात येईल तसेच नियमांनुसार अतिक्रमणावर दंडात्मक कारवाई करून नदीपात्र मोकळे करण्यात येईल, असे लेखी आश्वासन दिले. त्यानंतर ग्रामस्थांनी आंदोलन स्थगित केले. यावेळी माजी जिल्हा परिषद सदस्य, ग्रामपंचायत सदस्य विजय होळकर, माजी सरपंच संजय जपकर, शिवा होळकर उपस्थित होते.

# तरुणाची मोटारसायकल, मोबाईल लंपास

नगर – दारुची नशा जास्त झाल्यामुळे रस्त्याकडेलाच बाकड्यावर झोपलेल्या तरुणाची मोटारसायकल व मोबाईल अज्ञात चोरट्याने चोरुन नेल्याची घटना माळीवाडा येथील संग्राम वाईन्सजवळ घडली. याप्रकरणी सागर नवनाथ गिते यांनी कोतवाली पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दिली आहे.

तक्रारदार सागर नवनाथ गिते (वय ३३ वर्षे, रा. सूर्यानगर, तपोवन, सावेडी) हे १५ जून रोजी पहाटे ३:३० च्या सुमारास संग्राम वाईन्स, माळीवाडा येथे आले होते. दारू पिण्याची तलफ असल्याने त्यांनी आपली हिरो कंपनीची एच.एफ. डीलक्स दुचाकी (क्रमांक एमएच १६, सीबी ०१९५) संग्राम वाईन्ससमोरील रस्त्याच्या कडेला पार्क केली. त्यानंतर बाजूला असलेल्या बाकड्यावर बसून त्यांनी दारू प्राशन केली आणि नशा चढल्याने ते तिथेच झोपी गेले.

सकाळी ७ वाजता जाग आल्यानंतर सागर गिते यांनी दुचाकी पार्क केलेल्या ठिकाणी पाहिले असता, त्यांना त्यांची दुचाकी तिथे दिसून आली नाही. त्यानंतर भावाला फोन करण्यासाठी खिशात हात घातला असता, त्यांना त्यांचा व्हिवो कंपनीचा मोबाईलही सापडला नाही. त्यांनी परिसरातील लोकांकडे विचारपूस करून दुचाकी आणि मोबाईलचा शोध घेतला, परंतु काहीही उपयोग झाला नाही. आपली दुचाकी आणि मोबाईल अज्ञात चोरट्याने चोरी केल्याची खात्री पटल्यावर त्यांनी कोतवाली पोलीस स्टेशन गाठून फिर्याद दिली. फिर्यादीत म्हटले आहे, ३० हजार रुपये किमतीची एक मोटारसायकल व खिशात ठेवलेला विवो कंपनीचा मोबाईल, असे सुमारे ४० हजार रुपये किमतीचे साहित्य चोरीस गेले.

## सत्यनारायण गोणे यांचे अल्प आजाराने निधन



नगर – बागरोजा हडको येथील रहिवासी सत्यनारायण व्यंकय्या गोणे (वय ७५) यांचे १८ जून रोजी पहाटे अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पत्नी, ४ मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

## कमलबाई बारगजे यांचे वृद्धापकाळाने निधन



नगर – जंगूभाई तालीम, तोफखाना जवळील रहिवासी श्रीमती कमलबाई शंकरराव बारगजे (वय ९०) यांचे १६ जून रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

वृत्तपत्र विक्रेते सचिन डफळ यांच्या त्या आत्या होत.

## दादा फलके यांचे हृदयविकाराने निधन

नगर – नेप्ती रोड येथील जाधव पेट्रोल पंपा समोरील रहिवासी व



जिल्हा न्यायालयातील ज्येष्ठ टायपिस्ट दादा चंद्रभान फलके (वय ६०) यांचे १७ जून रोजी हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर फलकेवाडी, ता.शेवगाव येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पत्नी, २ मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, २७२३, गंजबाजार, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# महापालिकेकडून अहिल्यानगर शहरात दूषित पाणी पुरवठा; नळावाटे येतात अळ्या



महानगरपालिकेकडून गंज बाजार, सराफ बाजार परिसरात नागरिकांना दूषित पाणी पुरवठा होत आहे. (छाया : धनेश कटारिया)

नगर – शहराच्या मध्यवर्ती भागात असलेल्या गंज बाजार आणि सराफ बाजार परिसरात महापालिकेच्या नळ पाणीपुरवठा योजनेतून गेल्या काही दिवसांपासून अत्यंत दूषित पाणी पुरवठा होत असून, नळावाटे अळ्या येत असल्याच्या तक्रारी नागरिक करीत आहेत. त्यामुळे नागरिकांच्या आरोग्या प्रश्न गंभीर बनला आहे.

गंज बाजार आणि सराफ बाजार हे शहराचे अत्यंत गजबजलेले व्यापारी केंद्र आहे. मात्र, याच भागातील नागरिकांना गेल्या अनेक दिवसांपासून गढूळ आणि दूषित पाण्याचा सामना करावा लागत आहे. अनेक ठिकाणी पाणीपुरवठ्याच्या जलवाहिन्यांची गळती झाल्यामुळे सांडपाणी पिण्याच्या पाण्याच्या वाहिनीत मिसळत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. महापालिका दिवसाआड पाणी पुरवठा करीत असून, नळाला जे पाणी येते तेदेखील गढूळ दिसून येते. तसेच त्यात छोट्या अळ्या आढळून येतात. या दूषित पाण्यामुळे परिसरातील अनेकांना पोटाचे विकार, ताप येत असल्याचे काही नागरिकांचे म्हणणे आहे.

स्थानिक नागरिकांनी या संदर्भात वेळोवेळी महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाकडे तक्रारी केल्या आहेत. मात्र, प्रशासनाकडून केवळ आश्वासन मिळत असून, ठोस कार्यवाही करण्याकडे दुर्लक्ष केले जात असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. जलवाहिन्यांची दुरुस्ती न केल्यामुळे आणि पाईपलाईनमधील गळतीकडे लक्ष न दिल्यामुळे या परिसरात सातत्याने दूषित पाणी पुरवठा होत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

या परिसराला पाणी पुरवठा करणाऱ्या जलवाहिन्यांची त्वरित पाहणी करून गळती शोधून काढावी. पाईपलाईनमध्ये सांडपाणी मिसळल्याने दूषित झालेली पाणीपुरवठा यंत्रणा स्वच्छ आणि निर्जंतुक करावी. भविष्यात अशी परिस्थिती उद्‌भवू नये म्हणून जुन्या आणि गंजलेल्या जलवाहिन्या बदलण्याची मागणी नागरिकांनी केली आहे.

# जमिनीच्या वादातून भावावर जीवघेणा हल्ला; कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

नगर – जमिनीच्या वादातून सख्या भावाने आपल्या मुलांच्या मदतीने दुसऱ्या भावावर लोखंडी रॉड आणि लाकडी दांडक्याने जीवघेणा हल्ला केल्याची घटना केडगाव येथील लोंढे मळा येथे घडली. या घटनेत पती–पत्नी गंभीर जखमी झाले असून, कोतवाली पोलीस स्टेशनमध्ये चौघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

१४ जून रोजी रात्री १० वाजेच्या सुमारास अहिल्यानगरमधील केडगाव येथील स. नं. २८५/१, प्लॉट नं. ४१, खंडोबा मंदिराजवळ, लोंढे मळा येथे फिर्यादी जगन्नाथ कुंडलिक जाधव (वय ४९) हे घरी असताना त्यांना घराबाहेर काहीतरी आवाज आला. त्यांची पत्नी सुरेखा बाहेर गेल्या असता, त्यांना त्यांचे दीर मच्छिंद्र कुंडलिक जाधव आणि त्यांची मुले धनंजय, धिरज व मुलगी धनश्री हे त्यांच्या घराच्या कंपाउंडची भिंतीलगत असलेली माती उकरत असल्याचे दिसले.

सुरेखा यांनी त्यांना माती का उकरत आहात, भिंत पडेल असे विचारताच, समोरच्या व्यक्तींनी त्यांना शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. आरडाओरडा ऐकून जगन्नाथ जाधव बाहेर आले असता, त्यांनाही शिवीगाळ करत मारहाण करण्यात आली. मच्छिंद्र जाधव याने खोऱ्याच्या दांडक्याने जगन्नाथ यांच्या डोक्यावर वार केला तर धनंजयने लोखंडी रॉडने आणि धिरजने लाकडी दांडक्याने मारहाण केली. भांडण सोडवण्यास गेलेल्या सुरेखा यांनाही धनश्री हिने ओढून मारहाण केली. तसेच मच्छिंद्र जाधव याने पुन्हा माझ्या नादी लागला तर तुला जिवंत ठेवणार नाही, अशी धमकी दिली. मारहाणीत रक्तस्त्राव झाल्यामुळे जगन्नाथ जाधव यांनी रुग्णालयात उपचार घेतले आणि त्यानंतर कोतवाली पोलीस स्टेशनमध्ये तक्रार नोंदवली. पुढील तपास कोतवाली पोलीस करीत आहेत.

# गृहिणी

## आरोग्य

### प्रोटिन पावडर घेत असाल तर...

आजकाल लोक तंदुरुस्त राहण्यासाठी वेगवेगळ्या प्रकारच्या प्रथिनांचे सेवन करतात. विशेषतः जे लोक जिममध्ये जातात आणि निरोगी जीवनशैलीचे पालन करतात ते प्रोटीन पावडरचा जास्त वापर करतात. असे मानले जाते की स्नायू विकसित करण्याचा, शरीरातून बरे होण्याचा आणि प्रथिनांची कमतरता पूर्ण करण्याचा हा एक सोपा मार्ग आहे. परंतु लक्षात ठेवा, जर ते जास्त प्रमाणात किंवा चुकीच्या पद्धतीने घेतले तर ते शरीराला गंभीर नुकसान पोहोचवू शकते, विशेषतः मूत्रपिंड आणि यकृताच्या आरोग्यावर त्याचा वाईट परिणाम होऊ शकतो. जास्त प्रथिने सेवन केल्याने यकृतावर दबाव येतो. कालांतराने, यामुळे फॅटी लिव्हर, यकृतातील एंजाइमची असामान्य पातळी आणि इतर समस्या उद्भवू शकतात. जर ते अल्कोहोलच्या सेवनासोबत किंवा चुकीच्या आहारासोबत घेतले तर धोका वाढतो. संतुलित आहारासोबत (कार्बोहायड्रेट्स, फायबर आणि निरोगी चरबी) प्रथिने घ्या. जास्त प्रमाणात प्रथिने (विशेषतः प्राण्यांपासून बनवलेल्या पावडरमधून) सेवन केल्याने हाडांमध्ये कॅल्शियमची कमतरता निर्माण होऊ शकते, ज्यामुळे हाडे कमकुवत होतात. काही पावडरमध्ये जड धातू, संरक्षक आणि हानिकारक रसायने देखील मिसळली जातात, ज्यामुळे हृदयाशी संबंधित आजारांचा धोका वाढू शकतो. नेहमी विश्वासार्ह आणि चाचणी केलेल्या ब्रँडची प्रोटीन पावडर खरेदी करा. सप्लिमेंट्स सुरू करण्यापूर्वी डॉक्टरांचा किंवा पोषण तज्ञाचा सल्ला घ्या. मसूर, अंडी, मासे, काजू आणि बीन्स यासारख्या नैसर्गिक स्रोतांपासून प्रथिने घेण्याचा प्रयत्न करा आणि गरज पडल्यासच पावडर वापरा. तसेच, दिवसभर भरपूर पाणी प्या जेणेकरून मूत्रपिंड सहजपणे कचरा बाहेर टाकू शकतील आणि आरोग्यावर कोणताही अतिरिक्त भार पडणार नाही.

## पाककला

### चॉकलेट पेढा

**साहित्य :** मारी बिस्किट १ मोठं पॅकेट (१०-१२ बिस्किटे), कोको पावडर २ टेबलस्पून, मिल्क पावडर ४ टेबलस्पून, कंडेन्स्ड मिल्क ४ ते ५ टेबलस्पून, तूप १ टीस्पून, बदाम/पिस्ता काप सजावटीसाठी

**कृती :** मारी बिस्किट मिक्सरमध्ये टाकून बारीक पावडर करून घ्या. एका बाउलमध्ये बिस्किट पावडर, कोको पावडर आणि मिल्क पावडर एकत्र करा. त्यात १ टीस्पून तूप घालून मिक्स करा. आता थोडं थोडं कंडेन्स्ड मिल्क घालत मळून घ्या. मिश्रण घट्ट गोळा होईल इतपतच घाला. हाताला तूप लावून मिश्रणाचे लहान लिंबाएवढे गोळे करा. हलक्या हाताने दाबून पेढ्याचा आकार द्या आणि वर बदामपिस्ता लावा. तयार पेढे १५ मिनिटे फ्रीजमध्ये ठेवा म्हणजे सेट होतील.

## वास्तू

### शौचालया संबंधी

* टॉयलेटचा दरवाजा नेहमी बंद ठेवा.
* टॉयलेट आणि किचन समोरासमोर नकोत.
* बेडरूमला लागून टॉयलेट असेल तर मध्ये जाड पडदा लावा.
* टॉयलेटचे दार किचन किंवा देवघरासमोर उघडू नये.
* टॉयलेटमध्ये मीठाचा बाउल ठेवा, १५ दिवसांनी बदलत राहा.
* एक्झॉस्ट फॅन नेहमी चालू ठेवा.

## सौंदर्य

* बीटाचा तुकडा ५ मिनिट ओठांवर घासा. नैसर्गिक टिंट मिळतो.
* गुलाबपाणी + ग्लिसरीन: रोज रात्री लावा, हळूहळू गुलाबी होतील.
* डाळिंबाच्या दाण्यांचा रस १० मिनिट लावून ठेवा, मग धुवा.

## सल्ला

* भाजलेले पापड हवाबंद डब्यात भरा आणि सोबत २-३ लवंगा टाका. मऊ पडत नाहीत.
* पापड तळायचे असतील तर तेल चांगलं गरम करा, नाहीतर तेल पितात.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## दैनिक पंचांग

शुक्रवार, दि. १९ जून २०२६

**---, शके १९४८ पराभवनामसंवत्सर, निज ज्येष्ठ शुक्लपक्ष, आश्लेषा १०।०७, सूर्योदय ०६ वा. ३२ मि. सूर्यास्त ०५ वा. ३२ मि.**

### राशिभविष्य

**मेष :** कामात नवीन संधी मिळेल, उत्साह वाढेल. आर्थिक फायदा होण्याचे योग आहेत. वासातून लाभ होईल.

**वृषभ :** कुटुंबात आनंदाचे वातावरण राहील. जमिनीचे काम मार्गी लागेल. पैशाची आवक चांगली होईल.

**मिथुन :** नवीन ओळखी होतील, संपर्क वाढेल. बोलण्यातून कामे साध्य होतील. छोटा प्रवास घडेल.

**कर्क :** घरातील प्रश्न सुटतील. जुनी गुंतवणूक फायदा देईल. मन प्रसन्न राहील.

**सिंह :** नेतृत्वाची संधी मिळेल. समाजात मान वाढेल. आत्मविश्वास उंचावेल.

**कन्या :** नियोजित कामे पूर्ण होतील. नोकरीत बदलाचे योग आहेत. खर्च मर्यादित राहील.

**तूळ :** मित्रांकडून सहकार्य मिळेल. व्यवसायात करार होतील.

**वृश्चिक :** कामात मोठी जबाबदारी येईल. वरिष्ठ मदत करतील. अचानक धनलाभ संभवतो.

**धनु :** दूरच्या प्रवासाचा योग आहे. नशिबाची साथ मिळेल. धार्मिक कामात मन लागेल.

**मकर :** संशोधनात यश मिळेल. वारसाचे काम पुढे सरकेल. अचानक खर्च होईल.

**कुंभ :** भागीदारीतून फायदा होईल. वैवाहिक जीवनात सुसंवाद राहील. नवीन व्यक्ती भेटेल.

**मीन :** दैनंदिन कामात यश मिळेल. स्पर्धेत विजय होईल. नोकरवर्ग सहकार्य करेल.

## फिल्मीचक्कर क्र. १२४१ सौ. शैलजा कुलकर्णी

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | २ | | ३ | | ■ | ४ |
| | ■ | | ■ | | ■ | ५ | |
| ६ | ७ | ■ | ८ | | ■ | ९ | |
| १० | | | ■ | ■ | ■ | ■ | |
| ■ | | ■ | ११ | १२ | १३ | | |
| १४ | | | ■ | १५ | | ■ | ■ |
| ■ | | ■ | १६ | ■ | १७ | | १८ |
| ■ | १९ | | | | | ■ | |

**आडवे शब्द :-** १) 'शोले' चित्रपट 'गब्बरसिंग'ची भूमिका करणारा दिवंगत अभिनेता ५) जॉन ++ जनार्दन (चित्रपटाचे नाव) ६) आंसू ++ गये फूल (चित्रपटाचे नाव) ८) राम ++ शाम (चित्रपटाचे नाव) ९) ++ मेरे सपने (चित्रपटाचे नाव) १०) एक दाक्षिणात्य परंतु हिंदी चित्रपट अभिनेत्री ११) +++++ जरा जमके बरसो मेरा (गाणे) १४) करण +++ (सध्याचा एक दिग्दर्शक) १५) एक ++ है हम (चित्रपटाचे नाव) १७) ऋषी कपूर, सनी देओल, मीनाक्षी शेषाद्री यांचा एक चित्रपट १९) 'दबंग' अभिनेता

**उभे शब्द :-** १) अमर ++++ अँथनी (चित्रपटाचे नाव) २) ++ बिन मछली नृत्य बिन बिजली (चित्रपटाचे नाव) ३) आप के +++ (चित्रपटाचे नाव) ४) ++ + ++ तेरा रंग कैसा (गाणे) ५) ++ हो जाने जाने जा ना आखरी सलाम (गाणे) ७) अमिताभ बच्चन, स्मिता पाटील, शशी कपूर, परवीन बॉबी, रणजीत, राम सेठी यांचा एक गाजलेला चित्रपट १२) ++ मुराद (अभिनेता) १३) सुनील दत्त, नूतन यांचा एक गाजलेला चित्रपट १६) ++ मिलो सजना (चित्रपटाचे नाव) १८) ++ कमल (चित्रपटाचे नाव)

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

**सुविचार :** हार मानली तर संपलं, लढलात तर जिंकण्याची शक्यता तरी आहे.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### विजेचा दिवा लागल्यावर किडे का गोळा होतात?

रात्री आपण दिवा लावला की किडे आणि पतंग त्याभोवती पिंगा घालताना दिसतात. यामागचं मुख्य कारण म्हणजे त्यांची दिशाभूल होते. कोट्यवधी वर्षांपासून किडे रात्री उडण्यासाठी चंद्र आणि ताऱ्यांचा प्रकाश वापरतात. चंद्र खूप दूर असल्यामुळे त्याचा प्रकाश जमिनीवर समांतर येतो. किडे उडताना हा प्रकाश एका ठराविक कोनात ठेवतात आणि त्यामुळे त्यांना सरळ रेषेत उडता येते. हे त्यांचं नैसर्गिक दिशादर्शक यंत्र आहे. पण विजेचा बल्ब किंवा ट्यूबलाईट खूप जवळ असते आणि तिचा प्रकाश सगळ्या बाजूने पसरतो. किड्याला हा प्रकाश चंद्राचा वाटतो आणि तो त्याच्याशी कोन ठेवून उडायचा प्रयत्न करतो. दिवा जवळ असल्यामुळे तो जसा पुढे जाईल तसा प्रकाशाचा कोन सतत बदलत राहतो. कोन सारखा ठेवण्यासाठी किड्याला सतत वळावं लागतं आणि नकळत तो दिव्याभोवती गोल गोल फिरू लागतो. एकदा या चक्रात अडकला की त्याला बाहेर पडता येत नाही.

दुसरं कारण म्हणजे काही किडे जन्मजातच प्रकाशाकडे आकर्षित होतात. याला फोटोटॅक्सिस म्हणतात. विशेषतः जे किडे रात्री फुलांच्या शोधात असतात त्यांना अतिनील प्रकाश दिसतो. जुन्या बल्बमधून थोडा अतिनील प्रकाश बाहेर पडतो, त्यामुळे किड्यांना वाटते की इथे फुलं आहेत. म्हणून ते दिव्याकडे धाव घेतात. याशिवाय पांढरा आणि निळा प्रकाश किड्यांना जास्त दिसतो, पण पिवळा किंवा लाल प्रकाश कमी दिसतो. म्हणून पिवळ्या सोडियम दिव्याभोवती किडे तुलनेने कमी जमतात आणि पांढऱ्या डएऊकिंवा ट्यूबलाईटभोवती जास्त गर्दी होते. थोडक्यात सांगायचं तर किड्यांना दिव्याचं काही आकर्षण नसतं. उलट आपण तयार केलेल्या कृत्रिम प्रकाशामुळे त्यांची नैसर्गिक यंत्रणा गोंधळून जाते. त्यांच्या दृष्टीने हा एक अपघातच असतो. निसर्गाने त्यांना चंद्रावर विसंबून राहायला शिकवलं, पण आपण माणसांनी रात्रीचा अंधार घालवून त्यांचा रस्ता चुकवला. म्हणूनच किडे बिचारे दिव्याभोवती जीव तोडून फिरत राहतात.

यात आणखी एक महत्त्वाचा मुद्दा असा की किड्यांचे डोळे आपल्यापेक्षा वेगळे असतात. त्यांना 'संयुक्त डोळे' असतात ज्यात हजारो छोटी भिंगं असतात. त्यामुळे त्यांना हालचाल आणि प्रकाश खूप लवकर समजतो. रात्रीच्या वेळी अचानक प्रखर प्रकाश दिसला की त्यांचे डोळे दिपून जातात. दिपलेल्या अवस्थेत त्यांना कुठे जायचे हे समजत नाही आणि ते प्रकाशाच्या स्रोताजवळच थांबतात. काही संशोधकांचं असंही म्हणणं आहे की किडे प्रत्यक्षात प्रकाशापासून दूर जाण्याचा प्रयत्न करतात. दिव्याच्या मागची बाजू त्यांना जास्त काळी वाटते. अंधारात सुरक्षित वाटल्यामुळे ते तिकडे जाऊ पाहतात. पण मध्ये दिवा आल्याने त्यांचा रस्ता अडतो आणि ते त्याच्याभोवतीच घिरट्या घालत राहतात. याला 'मॅकबँड इफेक्ट' असंही म्हणतात. शहरी भागात प्रकाश प्रदूषण खूप वाढले आहे.

रस्त्यावरचे दिवे, गाड्यांचे हेडलाईट, घरांचे दिवे यामुळे रातकिड्यांचं संपूर्ण जीवनचक्र विस्कळीत होतं. त्यांना जोडीदार शोधणे, अंडी घालणे, अन्न मिळवणे या सगळ्या गोष्टी कठीण होतात. अनेक किडे रात्रभर दिव्याभोवती फिरून थकून मरतात. याचा परिणाम संपूर्ण परिसंस्थेवर होतो कारण किडे हे पक्षी, बेडूक आणि इतर प्राण्यांचे अन्न आहे. म्हणूनच आता 'डार्क स्काय' चळवळ सुरू झाली आहे. रात्री गरजेपुरताच आणि जमिनीच्या दिशेने प्रकाश टाकला पाहिजे. घराबाहेर उबदार पिवळा रंगाचा दिवा वापरला आणि रात्री अनावश्यक दिवे बंद ठेवले तर किड्यांचे जीव वाचू शकतात. किडे हे शत्रू नाहीत, निसर्गाच्या साखळीतले महत्त्वाचे घटक आहेत. आपल्या एका छोट्या सवयीने बदल करून आपण त्यांना त्यांचा नैसर्गिक रस्ता परत देऊ शकतो. दिवा लावताना एवढा विचार केला तर रात्रीचं आकाश आणि किड्यांचं आयुष्य दोन्ही वाचेल.

### प्रत्येकाचा विशेष गुण

एका गावाच्या वेशीवर एक खूप जुना सोनचाफ्याचा वृक्ष उभा होता. त्याची फुलं इतकी सुवासिक होती की संपूर्ण गाव त्यांच्या वासाने दरवळून जायचं. सकाळ झाली की बायका, मुली परडी घेऊन फुलं वेचायला येत. देवपूजेसाठी, वेणीत माळण्यासाठी सगळे सोनचाफ्याचीच वाट पाहत. पण त्या झाडाला खूप गर्व झाला होता. तो इतर झाडांना म्हणायचा, बघा, मला सगळे किती मान देतात. माझ्याशिवाय देवाची पूजाच होत नाही. तुमची पाने तरी कोण घेतो का?

बाजूला उभ्या असलेल्या कडुलिंबाला हे ऐकून वाईट वाटे, पण तो काहीच बोलत नसे. पिंपळ, वड सगळे शांतपणे त्याचं ऐकून घेत.एक वर्षी गावात भयंकर साथ आली. लोक आजारी पडू लागले. ताप, खोकला, अंगदुखी याने सगळे हैराण झाले. वैद्याने सांगितले की कडुलिंबाची पाने उकळून त्याचा काढा प्यायला तरच गुण येईल. मग काय, सगळे गावकरी कडुलिंबाकडे धावले. प्रत्येक घरात कडुलिंबाचा पाला, काढा, धुनी सुरू झाली. त्या दिवसात सोनचाफ्याकडे कोणी फिरकलंही नाही. त्याची सुंदर, सुवासिक फुलं झाडाखाली पडून सुकून गेली. देवपूजा तर लांबच राहिली, लोकांना जगण्याची चिंता पडली होती. तेव्हा सोनचाफ्याला आपली चूक कळली.

तो कडुलिंबाला म्हणाला, मित्रा, मी उगाच गर्व केला. तुझ्या कडू पानांत इतकी शक्ती आहे हे मला आज कळलं. माझा सुगंध फक्त मनाला आनंद देतो, पण तू तर लोकांचे प्राण वाचवतो. कडुलिंब हसून म्हणाला, अरे, प्रत्येकाची भूमिका वेगळी असते. तू आनंद देतोस, मी आरोग्य देतो. आपण दोघंही निसर्गासाठी महत्त्वाचे आहोत. मोठेपणा सुगंधात किंवा कडूपणात नसतो, तर उपयोगी पडण्यात असतो. साथ ओसरल्यावर गावकरी परत सोनचाफ्याची फुलं घ्यायला आले. पण आता सोनचाफा गर्व करत नव्हता. तो नम्रपणे आपली फुलं सगळ्यांना देत होता. त्याला कळलं होतं की संकटाच्या वेळीच खरी किंमत कळते.

तात्पर्य : रूप, रंग, सुगंध यापेक्षा कर्तृत्व महत्त्वाचे. कधी कोणाची गरज पडेल सांगता येत नाही, म्हणून कोणालाही कमी लेखू नये. प्रत्येक जीवात काही ना काही विशेष गुण असतोच.

## आत्मशक्ति



### अवकाशाचे अंतरंग

अशाप्रकारे अवकाश भ्रमण करणारे अवकाशयात्री, आम्हांला आमच्या अंतरांत जाण्यासाठी प्रेरीत करतात. संत महात्म्यांनी जागृत आत्मा आणि त्याच्या अमर्यादित ज्ञानाबाबत, जी शिकवण दिली आहे ती आम्हाला ज्ञान महासागरांत डुबण्याची प्रेरणा देते. धर्मग्रंथ आणि संतांची शिकवण आम्हाला आमच्या स्वघराकडे जाण्याचे रस्ते दाखवितात जेणेकरून आम्ही तेथे पोहोचू शकू.

एक जातक (बौध्द धर्मग्रंथ) कथा आम्हाला पुस्तकी ज्ञान आणि आंतरीक ज्ञान (आत्मज्ञान) ह्यांतील फरक स्पष्ट करून सांगते! एक प्रवासी समुद्र किनाऱ्यावर जातो. तो उभा असलेल्या समुद्रकिनाऱ्यावरील धोका त्याला जाणवतो. त्याच्या लक्षात येते की समुद्रापलीकडील दुसरा किनारा मात्र सुरक्षित आहे. त्या दुसऱ्या किनाऱ्यावर जाण्याचे तो ठरवितो. पण तेथे जाण्यासाठी सेतु किंवा नाव नसते. तेव्हा एक तराफा बनविण्याचे तो ठरवतो. तो काही लाकडे (बल्लया) आणि पाने गोळा करतो व त्यापासून एक छोटा तराफा बनवितो. आपल्या ताकदीने तराफा चालवित किनाऱ्यावर पोहचण्यांत यशस्वी होतो.

दुसऱ्या किनाऱ्यावर पोहोचल्यावर तो विचार करतो, ह्या तराफ्याने आतापर्यंत खूप मदत केली आहे, तेव्हा असा उपयोगी तराफा ह्यापुढे जमिनीवर चालतांना डोक्यावर, आपल्या पाठीवर घेऊन जाईन! एखाद्या गाढवासारखे त्या माणसाने त्या तराफ्याला पाठीवर उचलून घेतले तेव्हा आता हा तराफा त्याच्यासाठी केवळ एक ओझे ठरला व त्याचा त्याला आता काहीही उपयोग नसतो.

आम्ही ह्या जातक कथेचा खोलवर विचार केला तर असा निष्कर्ष निघतो की, त्या व्यक्तिने तो तराफा किनाऱ्यावरच ठेवून पायी चालणे योग्य झाले असते. कारण तराफा हा समुद्र पार करण्यासाठी असतो, डोक्यावर घेण्यासाठी नव्हे!

(क्रमश:)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## चिरंतन प्रेमाकडे वाटचाल (नाती घट्ट विणू या)

### प्रामाणिकपणा व संस्कार

दिवसापासून तुम्ही उशिराने यायला सुरुवात करता. अशाच प्रकारे, ऑफिसमधील इतर लोक कामाच्या बाबतीत तितकेसे प्रामाणिक नाहीत म्हणून कदाचित तुम्हीही प्रामाणिकपणाचा संस्कार सोडून द्याल. यामुळे नुकसान कोणाचं होईल ? इतर लोक काहीच गमावणार नाहीत.

सुरेश ओबेरॉय मला वाटायचं की हे जशास तसं वागणं बरोबर आहे. शिवानीदीदी आपण नेहमीच आपल्या चांगल्या गुणांना अखंडित ठेवलं पाहिजे. म्हणजेच आपला चांगुलपणा कायम राहिला पाहिजे.

सुरेश ओबेरॉय : जर आपण पूर्णपणे प्रेमस्वरूप आत्मा झालो तर आपल्या आजूबाजूचे सगळे तसेच होतील का?

शिवानीदीदी : सर्वप्रथम आपण स्वतः प्रेमस्वरूप बनू या. आपण आपल्या संस्कारांप्रमाणे वागू या. इतरांना आपली नक्कल करू दे. ते बदलले किंवा नाही बदलले तरीही, आपल्याला या स्वाध्यायाचा लाभ होईल. जेव्हा आपण नमतं घेतो तेव्हा माधुर्य हा आपला संस्कार बनतो. सुरुवातीला असं करणं थोडं अवघड वाटेलही.

सुरेश ओबेरॉय : माझ्या बायकोच्या माहेरी एक लग्नसमारंभ आहे. तिथे जायला मी नकार दिला कारण ते आमच्याकडच्या एका कार्याला आले नव्हते. शिवानीदीदी कोणीतरी विशिष्ट असं बागलं. तुम्ही त्याची नक्कल करायची काय गरज आहे?

सुरेश ओबेरॉय : पण सगळं जग असंच तर करतं. लोक अनेक कार्यक्रमांना जात नाहीत कारण त्या कार्यक्रमाचे आयोजक पूर्वी कधीतरी त्यांच्या कार्यक्रमाला आलेले नसतात.

शिवानीदीदी यामुळेच तर आज आपण सगळेच तणावाखाली आहोत. सगळे जग चिडतात म्हणून आपणही चिडतो. सगळेच कमकुवत होत आहेत तसेच आपणही. आपण फक्त चुकीच्या गोष्टींची नक्कल करत आहोत.

सुरेश ओबेरॉय : व्यावहारिकता आणि अध्यात्म यांत खूप अंतर आहे. शिवानीदीदी : व्यावहारिक जगात योग्य प्रकारे काम करण्यासाठी अध्यात्म हाच सर्वोत्तम मार्ग आहे. याचा अर्थ, आपल्याला आत्म्याच्या मूळ गुणांना जीवनात (क्रमश:)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

**कर्मचारी :** सर, माझा पगार वाढवा,
आता माझं लग्न झालं आहे.
**बॉस :** ऑफिसच्या बाहेर होणाऱ्या
अपघातांसाठी आम्ही जबाबदार नाही.

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* भारताचे राष्ट्रगीत कोणी लिहिले?

– रवींद्रनाथ टागोर

**– अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

## आहारवेद – आरोग्य संवर्धन

### पालक

तसेच पचनक्रिया सुधारण्यासाठीसुद्धा याचा उपयोग होतो. पडवळाच्या कोवळ्या फांद्या व वाळलेली फुले यांचा काढा साखर घालून घेतल्यास पचनक्रिया सुरळीत होते.

सावधानता : अति जुने व खूप पक्व झालेले पडवळ आहारात वापरू नये. याने पोटदुखी होऊ शकते. सर्व पालेभाज्यांमध्ये पालक सर्वश्रेष्ठ भाजी आहे. पालकाची भाजी आहारात जेवढी महत्त्वाची आहे. तेवढीच औषधी गुणधर्म असल्यामुळे आरोग्यदायीसुद्धा आहे. भारतामध्ये अगदी प्राचीन काळापासून पालकाची लागवड केली जाते. त्याचबरोबर युरोप, अमेरिका आणि आशियातील अनेक प्रदेशांमध्ये पालकाची लागवड केली जाते. पालकाची पाने ही फिकट हिरवी, टोकाकडे निमुळती, गुळगुळीत व पसरट अशी असतात. मराठीत पालक, हिंदीमध्ये पालक, संस्कृतमध्ये पालक्या, इंग्रजीत स्पिनॅच, तर शास्त्रीय भाषेमध्ये स्पिनासिया ऑलेरॅसिया या नावाने ओळखली जाणारी पालक भाजी चेनोपोडिएसी या कुळातील वनस्पती आहे. पालकाचे देशी पालक आणि विलायती पालक असे दोन प्रकार पडतात. आपण सहसा देशी पालकच आहारामध्ये वापरतो. विलायती पालक हा प्रकार आशियामध्ये आढळतो. पालक या भाजीची थंड हवेत झपाट्याने वाढ होते.

**(क्रमश:)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

# भिंगार अर्बन बँकेचे कर्मचारी सुनील राऊत यांचा सेवापूर्तीनिमित्त सत्कार

### कर्मयोगी व्यक्तींचे कार्य समाजाला दिशा देणारे असते : संगमनाथ महाराज



भिंगार अर्बन बँकेचे कर्मचारी सुनील राऊत यांचा सेवापूर्ती निमित्त महंत संगमनाथ महाराज यांच्याहस्ते सत्कार करण्यात आला.

नगर – भिंगार अर्बन को–ऑपरेटिव्ह बँकेचे कर्मचारी सुनील राऊत यांच्या सेवापूर्ती निमित्त आयोजित करण्यात आलेल्या सत्कार समारंभात त्यांच्या प्रदीर्घ, प्रामाणिक आणि कर्तव्यनिष्ठ सेवेला मानाचा मुजरा करण्यात आला. अनेक वर्षे बँकेच्या सेवेत राहून ग्राहकांशी जिव्हाळ्याचे संबंध निर्माण करणारे तसेच संस्थेच्या प्रगतीत महत्त्वपूर्ण योगदान देणारे कर्मचारी म्हणून सुनील राऊत यांचा गौरव करण्यात आला. शहराचे ग्रामदैवत श्री विशाल गणेश मंदिराचे महंत संगमनाथ महाराज यावेळी प्रमुख मान्यवर म्हणून उपस्थित होते. यावेळी माजी महापौर भगवानराव फुलसोंदर, नगरसेवक बाळासाहेब बोराटे, दत्ता कावरे, बँकेचे संचालक विष्णू फुलसौंदर, संजय चाफे, दत्ता जाधव, निलेश राऊत, गणेश राऊत, सविता राऊत, गीता राऊत, ऋषिकेश राऊत आदी उपस्थित होते. उपस्थितांनी सुनील राऊत यांना शाल, श्रीफळ, पुष्पहार आणि स्मृतिचिन्ह देऊन सन्मानित केले.

सेवापूर्ती हा कोणत्याही कर्मचाऱ्याच्या आयुष्यातील महत्त्वाचा टप्पा असतो. आपल्या सेवाकाळात केलेल्या कार्याचे मूल्यमापन आणि समाजाकडून मिळणारा सन्मान हीच खरी कमाई असते. सुनील राऊत यांनी १९९२ साली भिंगार अर्बन को–ऑपरेटिव्ह बँकेच्या मुख्य शाखेपासून नोकरीस सुरुवात केली आणि बँकेच्या सावेडी झोपडी कॅन्टीन शाखेत सेवापुर्ती केली. तब्बल ३४ वर्षे त्यांनी प्रामाणिकपणे, निष्ठेने आणि कर्तव्यदक्षतेने बँकेची सेवा बजावत संस्थेच्या प्रगतीत योगदान दिले. सहकाऱ्यांमध्ये आदर्श निर्माण करणारे कर्मचारी म्हणून त्यांची ओळख राहिली असल्याचे मत यावेळी अनेक वक्त्यांनी व्यक्त केले. त्यांच्या शांत, संयमी आणि सर्वांना सोबत घेऊन काम करण्याच्या वृत्तीचे विशेष कौतुक करण्यात आले.

यावेळी महंत संगमनाथ महाराज म्हणाले की, आजच्या स्पर्धेच्या आणि वेगवान युगात प्रामाणिकपणे आपली जबाबदारी पार पाडणाऱ्या व्यक्तींची समाजाला अत्यंत गरज आहे. कोणतेही पद मोठे नसते, तर त्या पदावर राहून केलेले कार्य मोठे असते. सुनील राऊत यांनी आपल्या सेवाकाळात केवळ नोकरी केली नाही, तर ग्राहकांचा विश्वास संपादन केला, सहकाऱ्यांचे प्रेम मिळवले आणि संस्थेच्या प्रगतीसाठी निष्ठेने योगदान दिले. सेवाभाव, प्रामाणिकपणा आणि शिस्त या मूल्यांवर उभे राहून त्यांनी केलेले कार्य तरुण पिढीसाठी प्रेरणादायी आहे. एखाद्या व्यक्तीची खरी ओळख त्याच्या पदावरून नव्हे तर त्याच्या वर्तनातून, कार्यातून आणि समाजाशी असलेल्या नात्यातून होत असते.

पुढे बोलताना संगमनाथ महाराज म्हणाले की, आयुष्यात संपत्तीपेक्षा संस्कार आणि माणुसकी अधिक महत्त्वाची असते. अनेक जण सेवेत येतात आणि निवृत्त होतात; परंतु काही व्यक्ती आपल्या कार्याचा ठसा समाजाच्या मनावर उमटवतात. सुनील राऊत हे अशाच व्यक्तिमत्त्वांपैकी एक आहेत. त्यांनी आयुष्यभर कर्तव्याला प्राधान्य दिले, सहकाऱ्यांना आपलेसे केले आणि संस्थेची प्रतिष्ठा वाढविण्यासाठी योगदान दिले. अशा कर्मयोगी व्यक्तींचा गौरव होणे ही समाजासाठी अभिमानाची बाब असून त्यांच्या कार्यातून नव्या पिढीने प्रेरणा घेऊन प्रामाणिकपणा, निष्ठा आणि सेवाभाव या मूल्यांचा अंगीकार करावा, असे आवाहनही त्यांनी केले.

याप्रसंगी बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी शशिकांत महाजन, संचालक कैलास खरपुडे, कैलास दळवी, अनिता भुजबळ, पंडितराव खरपुडे, सुभाष राऊत, अशोकराव कापरे, नंदकिशोर राऊत, ऋषिकेश राऊत, प्रथमेश राऊत, नितीन राऊत, शिवाजी शिंदे, दत्तात्रय साबळे, मच्छिंद्र फुलसौंदर, विधान रासकर, सागर पुंड, संदीप पाटील, सचिन थोरात, राजू राऊत, बाबासाहेब हजारे, अनुप बोरुडे, राजेंद्र भुजबळ, श्याम जाधव, नितीन बेद्रे, शिवा पटवेकर, छबुनाना जाधव, नितीन शेरकर, सतीश डागवाले, संजय डागवाले, सुभाष बागवाले यांच्यासह कर्मचारी, हितचिंतक आणि नातेवाईक उपस्थित होते.

सत्काराला उत्तर देताना सुनील राऊत यांनी अत्यंत भावनिक शब्दांत आपल्या भावना व्यक्त केल्या. ते म्हणाले की, भिंगार अर्बन बँकेने मला केवळ नोकरीच दिली नाही, तर आयुष्य घडविण्याची संधी दिली. या संस्थेत काम करताना अनेक ज्येष्ठांचे मार्गदर्शन, सहकाऱ्यांचे सहकार्य आणि ग्राहकांचे प्रेम मिळाले. आज मला मिळालेला हा सन्मान माझा एकट्याचा नसून माझ्या कुटुंबीयांचा, सहकाऱ्यांचा आणि संस्थेतील प्रत्येक सहप्रवाशाचा आहे. सेवाकाळात अनेक चांगले–वाईट प्रसंग आले, परंतु सर्वांच्या सहकार्यामुळे प्रत्येक आव्हानावर मात करता आली. संस्थेने माझ्यावर दाखविलेला विश्वास आणि आज व्यक्त केलेला स्नेह मी आयुष्यभर विसरणार नाही. निवृत्ती हा शेवट नसून समाजासाठी अधिक वेळ देण्याची नवी सुरुवात आहे. यापुढेही सामाजिक, धार्मिक आणि लोकहिताच्या कार्यात सक्रिय राहण्याचा प्रयत्न करेन, असे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुनील राऊत यांनी केले. गीता राऊत यांनी आभार मानले.

# प्रेरणादायी अक्षरधन

## विवेक भाव वोळखावा

"मुसाफिर" वाचनीय मननीय अक्षर धन

संकलन: दिशान फिचर्स




तुम्ही कुठे कुठे लक्ष देणार? लबाड लोक तुमचा फायदा घेणार. तुम्हाला हातोहात ठगवणार ! पण तुम्हाला यातलं काहीच नाही उमजणार. वरून दिसतात तसे ते आतून नसतात. त्यामुळे लोक फसतात. हे ते जाणून असतात. मग ते बोलताना आणतात एक आव आणि मनात रचतात वेगळाच डाव ! शहाण्यांनी ओळखायला हवा त्यांच्या मनीचा भाव !

सुभाषितकार म्हणतो, तो गोड बोलतो, पण गळा कापतो ! विश्वासपात्र नसतो. त्याची वाईट वृत्ती. तिच्यापायी आपत्ती ! दुष्टाचे लक्ष एकच, लाटणे संपत्ती ! म्हणून कुणी गोड बोलायला लागला की, सावरावे स्वतः ला. लागावे सावधानता राखायला. पण याचा अर्थ असा नव्हे की, कुणी धजूच नये गोड बोलायला किंवा कुणी गोड बोलला की त्याला बाहेर हाकलला. सुभाषितकाराची ही केवळ चेतावणी तुम्हाला. कारण बोलणं मधुर, तर हवं हृदयदेखील मधुर.

बोलण्यास मिठास, तर अंतःकरणातील तोच वास. गोडच करण्याचाही ध्यास. कृतीदेखील तशीच करण्याची आस. मग तो पावतो सज्जनपणास. बोलणे एक, मनात दुसरे, करणे अगदीच वेगळे ! हे सगळे दुष्टपणामुळे.

खरेदी–विक्रीचा धंदा करणारी एक कंपनी होती. एक जमिनीचा तुकडा त्या कंपनीला विकायचा होता. कित्येक वर्षापासून तो कंपनीकडे पडून होता. गिऱ्हाईकच मिळेना. मग त्यांनी एका दलालाला बोलावले. तो उत्तम विक्रेता होता. तो म्हणाला, चुटकीसरशी विकून देतो हा प्लॉट!

आणि त्याने गिऱ्हाईक आणले. सौदा पटला. प्लॉट विकला. उन्हाळ्यात प्लॉट विकला. नंतर पावसाच्या पाण्याने प्लॉट तलावात रूपांतरीत झाला. गिऱ्हाईक चिडले. कंपनीकडे ओरडत गेले. प्लॉटवर तीन फूट पाणी साचले आहे म्हणाले.

कंपनीचे मालक हादरले. तो विक्रेता शांत होता. इतर काही न बोलता गिऱ्हाईकाला सरळ म्हणाला, तुमचे पैसे परत घ्या. मला अधिक किंमत देणारं दुसरं गिऱ्हाईक मिळालं आहे. एक महिना झाला ना तुम्हाला प्लॉट घेऊन? त्या एक महिन्याचं तुमच्या रकमेचं व्याजही न्या.

गिऱ्हाईक बुचकळ्यात पडले. त्यांनी हे असे नव्हते अपेक्षिले. विक्रेता बोलतच होता. माझं दुसरं गिऱ्हाईक तेथे 'जलमहाल' बांधणार आहे.. महालासभोवती आपोआप तळं होतं. दुर्मीळ पाणी फुकट साचतं. त्यात कमळं फुलतील. रंगीबेरंगी मासे खेळतील. शिवाय नौकाविहाराचा आनंद लुटता येईल. असो. तुम्हाला काय ते कळणार ? तुम्ही न्या तुमचे पैसे परत.

गिऱ्हाईक ओशाळले. म्हणाले, हे सगळं नव्हतं आमच्या ध्यानी आलं. आम्हांलाच हवा तो प्लॉट. फक्त नौकाविहार करायला नौका कुठं मिळतील तेवढ सांगा.

विक्रेता म्हणाला,या कंपनीजवळ नौका आहेत. त्या पाहा. न्या. त्याही मिळतील.

गिऱ्हाईक पैसे नेण्याऐवजी नौकाचेही पैसे भरून परत गेले. कंपनीच्या अडगळीत पडलेल्या जुनाट निकामी नौकेचेही पैसे झाले. पण तिकडे गिऱ्हाईकाचे काय झाले? भुरळला, भाळला, विवेक गमावून बसला. त्याचे फळ त्याला मिळाले.

– किशोर गांधी

# लवकरच ब्राह्मण वधू–वर मेळाव्याचे आयोजन



नगर – सकल ब्राह्मण समाज, नगर यांच्यातर्फे ऋग्वेद भवन, चितळे रोड, नगर येथे नुकतीच सभा होऊन ब्राह्मण समाजातील विधूर, घटस्फोटित, विवाहत्सुक मुले व मुली यांचे लग्नाचे संबंधात ॲड. अच्युतराव पिंगळे यांचे अध्यक्षतेखाली सभा होऊन योग्य ते मार्गदर्शन, सूचना व ते घेऊन विस्तीर्ण चर्चा होऊन लवकरच वधू – वर मेळावा घेण्याचे ठरविलेले आहे.

सभेस, चंद्रचूड गोंगले, सेवानिवृत्त जिल्हा न्यायाधीश, अलका कुलकर्णी, विभव निसरगंड, किशोर जोशी, सोमनाथ मुळे, ॲड. निकिता रसाळ, महेश कुलकर्णी, ॲड. सचिन पाठक, विलास बडवे, किशोर कुलकर्णी, सौ. नेहा प्रभुणे, विवेकानंद रसाळ, किशोर कुलकर्णी, उदय जोशी, यशवंत आंबेकर, सौ. रोहिणी पुंडलिक आदी उपस्थित होते.

# 'जिल्हास्तर युवा पुरस्कारासाठी' ३० जूनपर्यंत प्रस्ताव सादर करावेत

नगर – युवकांच्या सामाजिक, शैक्षणिक व विकासात्मक कार्याला प्रोत्साहन देण्यासाठी जिल्हास्तर युवा पुरस्कारासाठी अर्ज मागविण्यात येत आहेत. पात्र युवक–युवती तसेच संस्थांनी विहित नमुन्यातील अर्ज व आवश्यक कागदपत्रांसह प्रस्ताव ३० जून पर्यंत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, अहिल्यानगर येथे कार्यालयीन वेळेत सादर करावेत, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरंगे यांनी केले आहे.

सन २०१८–१९, २०१९–२०, २०२०–२१, २०२१–२२, २०२२–२३, २०२३–२४, २०२४–२५ व २०२५–२६ या वर्षांसाठी जिल्हास्तर युवा पुरस्कारासाठी अर्ज मागविण्यात आले आहेत. पुरस्कारासाठी अर्ज करणाऱ्या युवक अथवा युवतीचे वय संबंधित पुरस्कार वर्षाच्या १ एप्रिल रोजी किमान १३ वर्षे पूर्ण झालेले व ३१ मार्च रोजी कमाल ३५ वर्षांपर्यंत असणे आवश्यक आहे.

संबंधित अर्जदाराचे जिल्ह्यात सलग पाच वर्षे वास्तव्य असणे बंधनकारक असून, केलेल्या कार्याचे पुरावे अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. पुरस्कार प्राप्त झाल्यानंतर किमान दोन वर्षे समाजोपयोगी कार्यात सक्रिय राहण्याचे हमीपत्र देणे आवश्यक राहणार आहे. एका जिल्ह्यात पुरस्कार प्राप्त करणारी व्यक्ती राज्यातील अन्य जिल्ह्यात जिल्हा युवा पुरस्कारासाठी अर्ज करण्यास पात्र राहणार नाही. तसेच केंद्र व राज्य शासनाच्या शासकीय व निमशासकीय कार्यालयांतील अधिकारी, कर्मचारी तसेच विद्यापीठांतर्गत महाविद्यालयांतील प्राध्यापक व कर्मचारी हे पुरस्कारासाठी पात्र राहणार नाहीत.

संस्थांसाठीही स्वतंत्र पात्रता निकष निश्चित करण्यात आले आहेत. अर्जदार संस्था सार्वजनिक विश्वस्त अधिनियम, १९५० अथवा मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम, १९५० अंतर्गत नोंदणीकृत असावी. संस्थेने किमान पाच वर्षे कार्यरत असणे आवश्यक असून, संस्थेच्या कार्याचे पुरावे अर्जासोबत सादर करणे बंधनकारक आहे. संबंधित संस्थेच्या सदस्यांचे पोलीस विभागामार्फत प्रमाणित चारित्र्य दाखले सादर करणे आवश्यक राहणार असल्याचेही कळविण्यात आले आहे.

# सेवाप्रीतच्या स्नेहमेळाव्यात महिलांच्या निस्वार्थ सामाजिक कार्याचा जागर

### उत्कृष्ट सामाजिक उपक्रम राबविणाऱ्या महिलांचा सन्मान; ३०० सदस्यांच्या योगदानातून वंचितांच्या जीवनात उजेड




सेवाप्रीत सोशल फाऊंडेशनचा दहावा वार्षिक स्नेहमेळावा उत्साहात पार पडला. मागील दहा वर्षांत संस्थेने केलेल्या विविध सामाजिक उपक्रमांचा आढावा यावेळी घेण्यात आला.

नगर – सेवाप्रीत सोशल फाऊंडेशनचा दहावा वार्षिक स्नेहमेळावा उत्साहात पार पडला. मागील दहा वर्षांत संस्थेने केलेल्या विविध सामाजिक उपक्रमांचा आढावा यावेळी घेण्यात आला. तसेच समाजसेवेसाठी निस्वार्थपणे योगदान देणाऱ्या महिलांच्या कार्याचा गौरव करण्यात आला. मागील वर्षभरात उत्कृष्ट सामाजिक उपक्रम राबविणाऱ्या ग्रुप लिडर आणि सदस्यांचा विशेष सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने करण्यात आली. यावेळी सेवाप्रीत सोशल फाऊंडेशनच्या संस्थापक अध्यक्षा जागृती ओबेरॉय, संचालक तथा ग्रुप लिडर अन्नू थापर, अर्चना खंडेलवाल, डॉ. सिमरन वधवा, गीता नय्यर, गितांजली माळवदे, निशा धुप्पड, रितू वधवा, सविता चड्ढा, स्विटी पंजाबी यांच्यासह संस्थेच्या महिला सदस्या उपस्थित होत्या.

यावेळी बोलताना जागृती ओबेरॉय यांनी सेवाप्रीतच्या दहा वर्षांच्या सामाजिक प्रवासाचा आढावा घेतला. त्या म्हणाल्या की, सर्व महिलांच्या एकत्रित सहभागातून आणि सामाजिक बांधिलकीतून सेवाप्रीतची वाटचाल सुरू आहे. शहरातील सुमारे ३०० महिला अधिकृतपणे संस्थेशी जोडल्या गेल्या असून त्या विविध सामाजिक उपक्रमांमध्ये सक्रिय योगदान देत आहेत. गरजू विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणणे, वंचित कुटुंबांना मदत करणे आणि समाजातील दुर्लक्षित घटकांना आधार देणे या माध्यमातून सेवाप्रीत समाजात सकारात्मक परिवर्तन घडवून आणत आहे.

परमेश्वर कोणत्या रूपात आणि केव्हा भेटेल हे कुणालाही सांगता येत नाही. प्रत्येक व्यक्तीत परमेश्वराचे अस्तित्व आहे आणि त्या परमेश्वराची सेवा करण्याचे कार्य सेवाप्रीतच्या माध्यमातून केले जात आहे, असे सांगताना त्यांनी सामाजिक सेवेचे महत्त्व अधोरेखित केले. दिवा स्वतः जळून इतरांना प्रकाश देतो, त्याचप्रमाणे सेवाप्रीतच्या सदस्या आपल्या कृतीतून इतरांच्या जीवनातील अंधार दूर करण्यासाठी प्रयत्नशील असल्याचे त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमाची सुरुवात गणेश वंदनाने झाली. त्यानंतर महिलांसाठी विविध मनोरंजनात्मक आणि बौद्धिक खेळांचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमांना उपस्थित महिलांनी प्रतिसाद दिला. स्नेहमेळाव्याचा सांस्कृतिक कार्यक्रमही विशेष आकर्षण ठरला. महिलांनी गायन, नृत्य तसेच विविध कलागुणांचे सादरीकरण करून उपस्थितांची मने जिंकली. टाळ्यांच्या कडकडाटात उपस्थितांनी कलाकार महिलांचे कौतुक केले. महिलांना हातावर आकर्षक सेवाप्रीतचा लोगो असलेला टॅटू काढण्यात आला होता.

यावेळी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. तानिया मुलतानी यांनी महिलांसाठी विविध खेळ घेतले. स्पर्धांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते बक्षिसे देऊन गौरविण्यात आले. तसेच वर्षभरात झालेल्या तंबोला खेळाचे देखील बक्षीस वितरण करण्यात आले. स्नेह, सेवा, सामाजिक बांधिलकी आणि महिलांच्या एकतेचा संदेश देणारा हा स्नेहमेळावा रंगला होता.

# सचोटीच्या कारभारामुळे 'कान्हूरपठार' ने विश्वास संपादन केला

**विनायक देशमुख**



कान्हूरपठार येथे विनायक देशमुख यांनी संस्थेस सदिच्छा भेट दिली. यावेळी संस्थेच्या अध्यक्षा श्रीमती सुशीलाताई दिलीपराव ठुबे यांनी त्यांचे स्वागत केले.

नगर – स्व.दिलीपराव ठुबे यांनी घालून दिलेल्या आर्थिक शिस्तीचे पालन करीत कान्हूरपठार पतसंस्था सचोटीने कारभार करीत आहे. त्यामुळेच संस्थेने सभासद आणि ठेवीदारांचा विश्वास संपादन केला आहे. म्हणूनच पतसंस्था चळवळीच्या दृष्टीने सध्याच्या संवेदनशील अशा काळात पतसंस्थेने वेगळे स्थान निर्माण केले आहे, असे प्रतिपादन भारतीय जनता पक्षाचे जिल्हा समन्वयक विनायक देशमुख यांनी केले.

कान्हूरपठार येथे श्री. देशमुख यांनी संस्थेस सदिच्छा भेट दिली. यावेळी संस्थेच्या अध्यक्षा श्रीमती सुशीलाताई दिलीपराव ठुबे, कार्यकारी संचालीका नमिताताई दिलीपराव ठुबे, भाजपाचे विश्वनाथ कोरडे, संचालक भास्कर ठुबे व सुहास शेळके आदी उपस्थित होते.

स्व.दिलीपराव ठुबे यांच्या आठवणींना उजाळा देताना श्री. देशमुख म्हणाले, आर्थिक शिस्तीचे कठोर पालन व राजकारणापासुन अलिप्तता हे धोरण स्व.दिलीपरावांनी स्वीकारले होते. त्यामुळे संस्थेची भक्कम पायाभरणी झाली आहे. सभासद व ठेवीदारांच्या हिताला प्राधान्य दिल्यामुळेच संस्थेने आपले वेगळेपण निर्माण केले आहे. अध्यक्षा श्रीमती सुशीलाताई ठुबे यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेल्या कामाला माझे संपूर्ण सहकार्य राहील, अशी ग्वाही श्री.देशमुख यांनी दिली.

प्रारंभी संस्थेची माहिती देताना कार्यकारी संचालिका नमिता ठुबे म्हणाल्या, संस्थेच्या सध्या १७ शाखा असुन ३०० कोटींपेक्षा जास्त ठेवी आहेत. संस्थेत जवळपास १०० कर्मचारी कार्यरत असुन संचालक मंडळाच्या एकमताने संस्थेचे निर्णय घेतले जातात. संस्थेच्या वतीने विनायक देशमुख व विश्वनाथ कोरडे यांचा सत्कार करण्यात आला.



अधिकमास (धोंडा) कार्यक्रमानिमित्त भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूलचे शिक्षक तथा अहिल्यानगर महानगरपालिकेचे पर्यावरण दूत सतीश गुगळे यांनी वृक्षारोपणाचा अनोखा आणि निसर्गपूरक उपक्रम राबविला.

# अधिकमासात वृक्षारोपणाचा अनोखा संदेश

### पर्यावरण दूत सतिश गुगळे यांचा निसर्गपुरक उपक्रम

नगर – भारतीय संस्कृतीत अधिकमास (धोंडा) हा धार्मिक श्रद्धा, दानधर्म आणि सत्कर्मांसाठी विशेष महत्त्वाचा मानला जातो. गुगळे परिवाराच्या जावई व मुलींसाठी आयोजित अधिकमास (धोंडा) कार्यक्रमानिमित्त भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूलचे शिक्षक तथा अहिल्यानगर महानगरपालिकेचे पर्यावरणदूत सतीश गुगळे यांनी वृक्षारोपणाचा अनोखा आणि निसर्गपूरक उपक्रम राबविला.

यावर्षी या कार्यक्रमाला आणखी एक विशेष कारण लाभले. गुगळे यांचे बंधू निलेश गुगळे यांच्या १३ जून रोजीच्या वाढदिवसानिमित्त देखिल वृक्षारोपण करण्यात आले. वाढदिवस साजरा करण्यासाठी केक, फुले किंवा भेटवस्तूंपेक्षा पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणारा वृक्षारोपणाचा उपक्रम राबवून कुटुंबीयांनी समाजासमोर एक आदर्श निर्माण केला. धोंड्याचा मान, वृक्षारोपणाचा संकल्प महान. या प्रसंगी कुटुंबातील ज्येष्ठ नागरिक, जावई, मुली, महिला, युवक आणि बालकांनी उत्साहाने सहभाग घेत विविध देशी वृक्षांची लागवड केली. वृक्षारोपणासोबतच वृक्षसंवर्धनाचा संकल्प करून पर्यावरण रक्षणाचा संदेश देण्यात आला.

# सनातन धर्मसभेच्या अधिकमासाची भक्तिमय सांगता; विष्णुयाग, पूर्णाहुती आणि महाप्रसादाने भाविक तृप्त



सनातन धर्मसभेच्या अधिकमासाची भक्तिमय सांगता विष्णुयाग, पूर्णाहुतीने झाली. (छाया – उदय जोशी)

नगर – अधिकमासानिमित्त सनातन धर्मसभा आयोजित धार्मिक कार्यक्रमांची सांगता उत्साहपूर्ण आणि भक्तिमय वातावरणात झाली. अधिकमासाच्या अखेरच्या दिवशी वैदिक मंत्रोच्चारात विष्णुयाग, पूर्णाहुती आणि महाप्रसाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमात पुरोहित उमेश वाळुंजकर, बंडोपंत धर्माधिकारी, सोमनाथ मुळे व शिंगवेकर, सचिन पाठक यांच्या वैदिक मार्गदर्शनाखाली विष्णुयाग विधिवत संपन्न झाला. यामध्ये यजमान संतोष रसाळ, दिनकर देशमुख, डॉ. मुळे परिवार, प्रमोद कुलकर्णी यांच्यासह अनेक भाविकांनी श्रद्धापूर्वक आहुती अर्पण करून धर्मलाभ घेतला. वैदिक परंपरेनुसार विष्णुयागाची पूर्णाहुती झाल्यानंतर सर्वांच्या सुख–समृद्धी, आरोग्य आणि कल्याणासाठी मंगल प्रार्थना करण्यात आली.

या धार्मिक सोहळ्यास सनातन धर्मसभेचे अध्यक्ष वेदमूर्ती महेश रेखे, वेदमूर्ती दत्तोपंत पाठक गुरुजी यांनी मार्गदर्शन केले. त्यांच्या उपस्थितीमुळे कार्यक्रमास विशेष धार्मिक व आध्यात्मिक अधिष्ठान प्राप्त झाले.

यावेळी मनोगत व्यक्त करताना नीलकंठ देशमुख म्हणाले, अधिकमास हा आत्मचिंतन, साधना आणि ईश्वरभक्तीचा पर्व मानला जातो. या काळात आयोजित विष्णुयाग, नामस्मरण आणि विविध धार्मिक उपक्रमांमुळे भाविकांना आध्यात्मिक ऊर्जा व समाधान प्राप्त झाले. समाजात भक्ती, संस्कार आणि एकात्मतेची भावना दृढ करण्यासाठी अशा धार्मिक उपक्रमांची आज नितांत आवश्यकता आहे.

अधिकमासानिमित्त विविध धार्मिक, आध्यात्मिक व भक्तिमय कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमांमुळे परिसरात भक्ती, श्रद्धा आणि नामस्मरणाचे वातावरण निर्माण झाले होते. सांगता सोहळ्यादिवशी भाविक उपस्थित राहिले. विष्णुयागाच्या पूर्णाहुतीनंतर आयोजित महाप्रसादाचा भाविकांनी लाभ घेतला.

अधिकमासाच्या पवित्र पर्वाची ही सांगता भक्ती, श्रद्धा आणि सामूहिक धार्मिक एकात्मतेचा अविस्मरणीय सोहळा ठरली. उपस्थित भाविकांनी भगवान विष्णूंच्या नामस्मरणात सहभागी होत आध्यात्मिक आनंदाचा अनुभव घेतला. या संपूर्ण धार्मिक सोहळ्याच्या यशस्वी आयोजनासाठी पुरोहित उमेश वाळुंजकर, बंडोपंत धर्माधिकारी, सोमनाथ मुळे व शिंगवेकर, सचिन पाठक, संतोष रसाळ, दिनकर देशमुख, डॉ. मुळे परिवार, प्रमोद कुलकर्णी, नीलकंठ देशमुख, उमेश नगरकर तसेच सेवेकरी व भाविकांचे सहकार्य लाभले. त्यांच्या परिश्रम, समर्पण आणि भक्तिभावामुळे अधिकमासातील हा धार्मिक उत्सव यशस्वीरीत्या झाला.

# धम्माल मनोरंजन

## सुविचार



**परिश्रमांनी शरीर निरोगी राहते व मन निर्मळ बनते.**


## दिनविशेष १९ जून

१५९५ : गुरु हर गोविंद सहावे सिख गुरु यांचा जन्म. (मृत्यू: ३ मार्च १६४४)
१६२३ : ब्लेस पास्कलफ फ्रेंच गणितज्ञ तत्त्वज्ञानी यांचा जन्म. (मृत्यू: १९ ऑगस्ट १६६२)
१७६४ : जोसेगेर्व्हासियो आर्तिगास उरुग्वेचे राष्ट्रपिता यांचा जन्म.
१८७७ : पांडुरंग चिमणाजी पाटील पुण्याच्या कृषी महाविद्यालयाचे पहिले प्राचार्य यांचा जन्म.
१९४१ : वाक्लाव क्लाउस चेकोस्लोव्हाकियाचा राष्ट्राध्यक्ष यांचा जन्म.
१९४५ : आँगसान सू की म्यानमारची राजकारणी यांचा जन्म. १९४७ : सलमान रश्दी ब्रिटिश लेखक यांचा जन्म.१९६२ : आशिष विद्यार्थी भारतीय अभिनेता यांचा जन्म.१९७० : राहुल गांधी भारतीय राजकारणी यांचा जन्म.१९७६ : डेनिस क्रॉवलेफ फोरस्क्वेअरचे सह-संस्थापक यांचा जन्म.१९८५ : काजल अगरवाल भारतीय सिने-अभिनेत्री यांचा जन्म.
मृत्यू :१७४७ : नादिर शहा पर्शियाचा सम्राट यांचे निधन. (जन्म: २२ ऑक्टोबर १६९८)
१९३२ : रेव्ह. जस्टिन एडवर्ड मराठी संतवाङ्मयाचे अभ्यासक आणि प्रचारक यांचे निधन.
१९४९ : सैयद जफरुल हसन भारतीय तत्त्वज्ञ यांचे निधन. (जन्म: १४ फेब्रुवारी १८८५)
१९५६ : थॉमस वॉटसन अमेरिकन उद्योगपती, आय. बी. एम. चे अध्यक्ष यांचे निधन. (जन्म: १७ फेब्रुवारी १८७४)१९९३ : विल्यम गोल्डिंग नोबेल पारितोषिक विजेते इंग्लिश लेखक यांचे निधन. (जन्म: १९ सप्टेंबर १९११)
१९९६ : कमलाबाई पाध्ये समाजसेविका यांचे निधन.
१९९८ : रमेशमंत्री प्रवासवर्णनकार, कथाकार आणि विनोदी लेखक यांचे निधन. (जन्म: ६ जानेवारी १९२५)
२००० : माणिक मुदलियार तथा माणिक कदम मराठी-हिंदी रंगभूमी चित्रपट अभिनेत्री यांचे निधन.
२००८ : बरुण सेनगुप्ता बंगाली पत्रकार यांचे निधन. (जन्म: २३ जानेवारी १९३४)

## शोक श्लोक झाला

महर्षी वाल्मीकींनी वेदतुल्य रामायणाची रचना केली. त्याच्या निर्मितीची कथा मोठी विलक्षण आहे. नारदांनी वाल्मीकींना श्रीरामचरित्र सांगितले व हे चरित्र तू काव्यब्ध कर असे सांगितले. तेव्हापासून वाल्मीकींच्या मनात रामचरित्र घोळत होते. सगळे कथाप्रसंग डोळ्यापुढे दिसत होते पण हे काव्य कोणत्या वृत्तात छंदात लिहावे त्यांना समजत नव्हते. छंद सुचत नव्हता. एके दिवशी वाल्मिकी नित्याप्रमाणे फुले, समिधा गोळा करण्यासाठी आश्रमाच्या बाहेर फिरत होते. त्यावेळी त्यांनी एक दृश्य पाहिले. एका वृक्षावर क्रौंच पक्ष्यांची एक जोडी आनंदाने गात बसली होती. त्याचवेळी त्यांनी एक दृश्य पाहिले. एका वृक्षावर क्रौंच पक्ष्यांची एक जोडी मोठ्या आनंदाने गात बसली होती. त्याचवेळी तेथे आलेल्या एका पारध्याने एक बाण मारुन त्या क्रौंच पक्ष्यांपैकी नर पक्ष्याला ठार मारले. तो घायाळ झालेला पक्षी जमिनीवर कोसळल. त्याची पत्नी आर्त स्वरात आक्रोश करु लागली. ते पाहताच वाल्मिकींचे मन कळवळले. एकाचवेळी त्यांच्या मनात शोक आणि क्रोध निर्माण झाला. तशा मनस्थितीत त्यांनी त्या पारध्याला शाप दिला. मा निषाद प्रतिष्ठा त्वमगम सम हे निषादा तू निष्पाप क्रौंच पक्ष्याठा ठार मारलेस तुला कधीही मनशांती लाभणार नाही. तशाच मनस्थितीत वाल्मिकी आश्रमात आले. त्यावेळी ब्रम्हादेव प्रकट होऊन वाल्मिकींना म्हणाले महर्षी आज तुझा शोक एका श्लोकारुपात प्रकट झाला. तु एका अगदी नवीन अशा अनुष्टभ् छंदाचा उद्गाता झाल्यास. तुला रामकथा लिहिण्यासाठी छंद हवा होता. तो तुला आज मिळाला. याच छंदात तू रामकथा लिही. मग वाल्मिकींनी अनुष्टुभ छंदात चोवीस हजार श्लोकात रामायण लिहिले.

## महाशब्दकोडे




### आडवे संकेत

१) पैसा मिळविण्याच्या नादी लागलेला
४) अगदी थोडा वेळ
७) गरीब, दीन
९) मुकाबला, झुंज
१०) कृत्य, काम
११) यश, सिद्धी
१३) राग, घुस्सा
१५) एक तेल बी
१७) दुर्दैवी, अपशकुनी
१९) कमी खर्च
२०) अंकगणितात ज्या संख्येला तिनेच गुणले असता गुणाकार दिलेल्या संख्येइतका येतो ती मूळची संख्या.
२२) अस्थिर
२४) एका रोगाचे नाव
२५) सुताराजवळील एक हत्यार
२७) एक अंतर्वस्त्र
२८) सर्व वस्तू
३१) गेरु
३२) सरकारी दप्तराचा मुख्य अधिकारी
३३) बैलाच्या नाकातील दोरी
३५) कोपरा, एक भांडे
३६) थर, पडदा
३७) कुश
३८) बुद्धि
३९) एका मुलाचे नाव
४२) वाईट सवय
४४) अखंड
४५) इद्रिय, इच्छा
४६) अटीची भाषा
४८) दाढी हाले
५०) रक्ताने माखलेला
५१) एक फूल
५२) अंड्यातून जन्मलेला

### उभे संकेत

१) तडीस नेणे
२) वंदन, अभिवादन
३) शिवधनुष्य
५) एक काळ
६) सुक्ष्म अंश
८) थोडे कडू
१०) माथा, ललाट
१२) पुजारी
१४) वेळ दर्शक यंत्र
१६) वास्तव्य
१७) एक प्राणी
१८) मुख, आनन
२१) ज्यात पुरळ येत नाही असा गोवर
२३) भांडण असणे
२५) औषधाकरीता प्रसिद्ध शहर
२६) चिता
२७) रावण
२८) साळीचा नवरा
२९) ण म चा अक्षरबदल
३०) नक्र
३४) सुट, मुभा
३५) मृदू
३९) अठरा पुराणापैकी एक
४०) वंदनाचा शद्ब
४१) जे का गांजले
४३) वाकबगार
४७) भक्ती करणारा
४९) एक फळ

### मागील उत्तर






१) कपडे व भांडी धुण्यासाठी वापरलेल्या डिटर्जंटमध्ये काय असतात?
अ)नायट्रेटस ब)बायकार्बोनेट्स क)सल्फोनेट्स ड)रिबम्युटनेट्स
२) मानवाने बनविलेला पहिला कृत्रिम धागा कोणता होय?
अ)रेऑन ब)नायलॉन क)पॉलिस्टर ड)टेरीकॉट
३) खालीलपैकी कोणत्या खताचा अवशिष्ट पदार्थ (रेसिड्यू) आम्लधर्मी असतो?
अ)युरिया ब) अमोनिअम फॉस्फेट
क)अमोनिअम सल्फेट ड) सल्फेट ऑफ पोटॅश
४) खालीलपैकी कोणता पदार्थ म्हणजे एक प्रथिने आहे?
अ)ग्लुकोज ब)ॲमिलोज क)सेल्युलोज ड)पेक्टिन
५) कागदाचा लगदा पांढराशुभ्र बनविण्यासाठी खालीलपैकी कोणता पदार्थ वापरतात?
अ) क्लोरिन ब)कॉस्टिक सोडा
क)सोडिअम हायपोक्लोराईड ड)चुना
६)चांदीचा चमचा तोंडात घेऊन जन्माला येणे या वाक्प्रचाराचा अर्थ ?
अ)गर्भश्रीमंत असणे ब)मौल्यवान वस्तू वापरणे
क)चमच्याने दूध पाजणे ड)चांदीच्या विटेचे चमचे बनविणे
७) जो अत्यंत खर्चीक असतो तो?
अ)कंजुष ब)उधळ्या क)चिकट ड)दानशुर
८) खालीलपैकी कोणता चामड्यामधील मुख्य घटक होय?
अ)कार्बोहायड्रेट ब)कोलॅजिन क)पॉलिमर ड)न्यूक्लिइक आम्ल
९) कार्बन डेटिंग ही खालीलपैकी कोणती निश्चित करण्याची शास्त्रीय पद्धत आहे?
अ)कार्बनची जाडी ब)कोळशाचे साठे
क)वस्तूचे वय ड) कार्बनची मात्रा
१०) आपणा बऱ्याच वस्तू दिसतात, कारण त्या..... ?
अ)प्रकाश परावर्तित करतात. ब)प्रकाश बाहेर टाकतात.
क) प्रकाश शोषून घेतात. ड) प्रकाशाचे प्रणमन करतात.
११) कीटकभक्षी वनस्पती वाढतात त्या मातीमध्ये कशाचा अभाव असतो? अ)पाण्याचा ब) मॅग्नेशिअमचा
क)कॅल्शिअमचा ड)नायट्रेट्सचा
१२) अल्गे (शेवाळ) आणि फंगस (बुरशी) यांमध्ये काय फरक आहे?
अ)शेवाळात हरितद्रव्य असतो, बुरशीत ते नसते.
ब) बुरशीत हरितद्रव्य असते, शेवाळात नसते.
क) काहीही फरक नाही, दोन्हीत हरितद्रव्य असते.
ड) काहीही फरक नाही, दोन्हीत हरितद्रव्य नसते.
१३) फुलास सुगंध कशामुळे प्राप्त होतो?
अ)हवेशी संपर्क ब)पाकळ्यांमधील तेल
क)झाडाच्या बिया ड)मधमाशा
१४) खालीलपैकी भाववाचक नाम नसलेला शब्द ओळखा?
अ)संत ब)प्रेमक)खंत ड) शांती

**उत्तर: (१-क), (२-ब), (३-क ), (४-क ), (५-अ), (६-अ), (७-ब), (८-ब), (९- क ), (१०-अ ), (११-ड), (१२-अ ), (१३-ब ),(१४-अ).**

## विनोद




एक बाई प्रत्येक नवीन माणसाला वय सांगताना कमी- जास्त सांगत असे.
एके दिवशी ती आपल्या मुलीबरोबर पार्टीला गेली असता तेथील चार वेगवेगळ्या माणसांना तिने आपलं वेगवेगळं वय सांगितलं. उदा. कोणाला २०, कोणाला २५,तर कोणाला २८ वर्षे तर कोणाला आणखीण वेगळं.
अचानक तिच्या मुलीने तिचा हात खेचला आणि एका बाजुला नेऊन बजावलं, 'हे बघ आई, तू तुझे वय कोणाला कितीही सांग, पण माझ्या आणि तुझ्या वयात कमीत कमी नऊ महिन्यांचे अंतर असायला हवे।'

## जनरल नॉलेज — देशातील प्रमुख राष्ट्रीय उद्याने

| नाव | राज्य | क्षेत्रफळ(हे.) | प्रमुखप्राणी |
|---|---|---|---|
| काझीरंगा | आसाम | ४३० | गेंडा, रानम्हैस, हत्ती, गावे,वाघ, हरिणे,सिंह,हरिणे. |
| सासन-गीर | गुजरात | १४१२ | सिंह, हरिणे. |
| नागर /होळळ | कर्नाटक | ५७१ | वाघ, हत्ती, बिबटे, अस्वल, हरिणे. |
| बांधवगड | मध्यप्र. | १०५ | वाघ, बिबटे ,गवे,हरिणे. |
| ताडोबा | महाराष्ट्र | ११६ | वाघ, बिबटे, गवे, अस्वल, हरिणे. |
| कैबुल | मणीपूर | २५ | थामिन(दुर्मिळ मणिपूरी लामजो हरिणे). |
| नंदादेवी | उत्तरप्र. | ६३० | हिमबिबटया, मृग,तपकिरी, अस्वले, कस्तुरी बोकड. |
| भरतपूर | राजस्थान | २९ | पाणपक्षी. |

## फिल्मी शब्दकोडे






### आडवे संकेत

१) मनोज वाजपेयी आणि रविना टंडन यांचा चित्रपट.
३) सन २००४ मध्ये आलेला चित्रपट 'ईश्क है तुमसे'चा नायक.
७) ऋषी कपूरचे नायक वडील.
११) सन १९८५ मध्ये आलेला चित्रपट 'जान की बाजी'ची नायीका.
१२) जबसे मै जरासा हो गया राम कसम मेरा बडा नाम हो गया....
१४) आदत से (चित्रपट)
१५) दिलवाला (चित्रपट)
१७) सन १९९८ मध्ये आलेल्या या चित्रपटात बॉबी देओल आणि नेहा होते.
१९) 'कुछ कुछ होता है' या चित्रपटाची नायीका.
२३) अतुल अग्निहोत्री आणि सोनाली बेंद्रेचा हिट चित्रपट.
२४) सन १९९४ मध्ये आलेला चित्रपट 'आओ प्यार करे'चा नायक.
२५) शत्रुघ्न सिन्हा आणि श्रीदेवीचा चित्रपट.
२७) धनोवा (दिग्दर्शक)
२८) सन १९९५ मध्ये दिग्दर्शक हरमेश मल्होत्राच्या या चित्रपटात जितेंद्र आणि माधूरी दीक्षीत होते.
३२) फैजल खान आणि अंजली जड्डारचा चित्रपट.
३३) मेरी (चित्रपट)
३४) सन १९९४ मध्ये दिग्दर्शक राजीव रॉयच्या या चित्रपटात अक्षय कुमार आणि सुनील शेट्टी होते.
३५) नंदीता (नायीका.

### उभे संकेत

२) अखियोंसे मारे (चित्रपट)
३) इना मिना (चित्रपट)
४) सन १९९९ मध्ये आलेला चित्रपट 'वास्तव'मध्ये संजय दत्तचा भाऊ.
५) का गुंडाराज (चित्रपट)
६) चांदनी (चित्रपट)
७) सन १९९५ मध्ये आलेला चित्रपट 'याराना'चा खलनायक.
८) ढिल्लो (नायीका)
९) दिपक तिजोरी, माधूरी दीक्षीत आणि शाहरुख खानचा चित्रपट.
१०) सन २००४ मध्ये आलेल्या या चित्रपटात इरफान खान आणि तब्बूची भूमिका आहे.
१३) अनिल कपूर आणि रानी मुखर्जीचा चित्रपट.
१६) बस्स (चित्रपट)
१८) सन १९८५ मध्ये आलेला चित्रपट 'पैसा ये पैसा'ची नायीका.
२०) या नावाने दोन चित्रपट आले. पहिल्यात राजेश खन्ना आणि दुसऱ्यात गोविंदा होता.
२१) जिंदगी का सफर है ये कैसा कोई समजा नही...
२२) लाल रुमाल (चित्रपट)
२६) ऋषी कपूरची नायिका पत्नी.
२९) सन २००२ मध्ये आलेल्या या चित्रपटात शाहरुख खान, माधूरी दीक्षीत आणि ऐश्वर्या रॉय होते.
३०) सच्चाई की (चित्रपट)
३१) प्यार है (चित्रपट)
३३) अनोखी (चित्रपट)

### मागील फिल्मी उत्तर



## आरोग्य

**अर्धशिशीवर कच्चा पेरु**

**अर्धशिशीवर बेजार झालेल्यांना** अर्धशिशी घालविण्याचा उपाय आहे. अर्धवट क...



पेरु पाण्यात उगाळून त्याला लेप कपाळावर दुखत असलेल्या भागावर लावावा. एक ते तीन तासांतच अर्धशिशी पळून जाते.

**पेरुच्या बियांचा उपयोग**

पेरुच्या बिया वाटून त्यात साखर आणि पाणी टाकून चांगले हलवून ते मिश्रण घ्यावे. पित्ताचा ज्यांना वारंवार त्रास आहे त्यांना लाभ होतो.

## चारोळी

आजही मला तू
पूर्वीसारखाच आवडतो
तरीही उगीचाच भांडून
आपण आयुष्य दवडतो.

# अंतिम एमबीबीएस परीक्षेत डॉ. रुचिल सप्तर्षी उत्तीर्ण

नगर – पुणे येथील बी. जे. वैद्यकीय महाविद्यालय व ससून सर्वोपचार रुग्णालय येथून डॉ. रुचिल सप्तर्षी यांनी अंतिम एमबीबीएस परीक्षा यशस्वीरित्या उत्तीर्ण केली असून, लवकरच ते वैद्यकीय इंटर्नशिपला प्रारंभ करणार आहेत.



अहिल्यानगरशी अनेक पिढ्यांपासून घट्ट नाते असलेल्या सप्तर्षी परिवारातील डॉ. रुचिल हे अहिल्यानगरचे ज्येष्ठ व सर्वपरिचित कै. ड. गजानन सप्तर्षी व कै.प्रमिलाबाई सप्तर्षी यांचे नातू आहेत. ते राजेंद्र व प्राची सप्तर्षी यांचे पुत्र असून, दोघेही सुशिक्षित कमर्शियल आर्टिस्ट आहेत आणि कर्णबधिर आहेत. शिक्षणाविषयीची त्यांची निष्ठा, जिद्द आणि मुलांना दिलेली सातत्यपूर्ण प्रेरणा यांच्या बळावर त्यांनी आपल्या दोन्ही मुलांना वैद्यकीय क्षेत्रात घडविले. रुचिल यांचे ज्येष्ठ बंधू डॉ. वरद सप्तर्षी हे मुंबई येथे सल्लागार फेसिअल सर्जन (Consultant facial surgeon) तसेच देशभरातील विशेषीकृत फेसिअल प्लास्टिक व कॉस्मेटिक सर्जरी क्लिनिक साखळीचे वैद्यकीय संचालन प्रमुख (Medical Operations Head) म्हणून कार्यरत आहेत.

कर्णबधिर पालकांच्या दोन्ही मुलांनी वैद्यकीय क्षेत्रात यश मिळविल्याने हा संपूर्ण परिवारासाठी अभिमानाचा क्षण ठरला आहे. जिद्द, शिक्षणाची ताकद आणि कुटुंबाच्या पाठबळातून यश संपादन करता येते, याचे हे प्रेरणादायी उदाहरण आहे. डॉ. रुचिल यांच्या या यशाबद्दल अहिल्यानगर व पुणे येथील नातेवाईक, मित्रपरिवार आणि हितचिंतकांनी त्यांचे अभिनंदन करून त्यांच्या भावी वैद्यकीय कारकिर्दीसाठी शुभेच्छा व्यक्त केल्या आहेत.

# जनादेशाशी गद्दारी करणाऱ्या खासदारांना 'राष्ट्रीय भ्रष्टांजली'!

## लोकशाहीच्या नैतिकतेवर प्रश्नचिन्ह, जनादेशाचे अपहरण म्हणजे लोकशाहीचे वस्त्रहरण : ॲड. कारभारी गवळी

नगर – मतदारांनी एखाद्या विशिष्ट पक्षाची विचारसरणी, धोरणे आणि कार्यक्रम यांवर विश्वास ठेवून निवडून दिलेले खासदार सत्तेच्या मोहापोटी अथवा वैयक्तिक लाभासाठी आपल्या पक्षाचा त्याग करून सत्ताधारी पक्षात सामील होत असतील, तर अशा लोकप्रतिनिधींना पीपल्स हेल्पलाईन आणि भारतीय जनसंसदेच्या वतीने प्रतीकात्मक 'राष्ट्रीय भ्रष्टांजली' वाहण्यात येईल, अशी घोषणा करण्यात आली आहे.

ही मोहीम कोणत्याही व्यक्तीविरोधात नसून लोकशाहीला पोखरणाऱ्या भ्रष्ट आणि स्वार्थी मानसिकतेविरोधात असल्याचे संघटनेने स्पष्ट केले आहे.

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या लोकसभेतील सहा खासदारांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील पक्षात प्रवेश करण्याबाबत सुरू असलेल्या चर्चांच्या पार्श्वभूमीवर पीपल्स हेल्पलाईन, भारतीय जनसंसद आणि जनलोक अदालत यांच्या वतीने लोकशाही मूल्यांच्या संरक्षणाचा मुद्दा उपस्थित करण्यात आला आहे.

जनतेने दिलेला जनादेश ही कोणत्याही लोकप्रतिनिधीची वैयक्तिक मालमत्ता नसून सार्वजनिक विश्वासाची अमानत आहे. त्यामुळे त्याचा वापर सत्तावाटप, राजकीय सौदेबाजी, संपत्ती, प्रतिष्ठा अथवा वैयक्तिक फायद्यासाठी केला जाऊ नये, अशी भूमिका संघटनेने मांडली आहे.



यावेळी पीपल्स हेल्पलाईनचे अध्यक्ष ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. कारभारी गवळी यांनी संत ज्ञानेश्वर महाराजांच्या 'पसायदान'चा संदर्भ दिला. ते म्हणाले, पसायदान ही केवळ धार्मिक प्रार्थना नाही; ती समाजकल्याण, विश्वमैत्री, नैतिकता आणि कर्तव्यनिष्ठेची सार्वत्रिक शिकवण आहे. दुष्ट प्रवृत्तींचा अंधार दूर व्हावा, सर्व जीवांमध्ये मैत्री निर्माण व्हावी आणि प्रत्येकाला स्वतःच्या कर्तव्याची जाणीव व्हावी, ही पसायदाना मागील व्यापक भूमिका आहे. त्यामुळे जनतेच्या विश्वासाशी प्रतारणा करणाऱ्या लोकप्रतिनिधींनी पसायदानातील मूल्यांचे स्मरण ठेवले पाहिजे.

पीपल्स हेल्पलाईन आणि जनलोक अदालत यांच्या वतीने मांडण्यात येणारे 'जनलोक आरोपपत्र' हे कोणत्याही न्यायालयीन प्रक्रियेचा भाग नसून जनतेच्या नैतिक न्यायपीठासमोर ठेवण्यात आलेले प्रश्नपत्र आहे, असेही स्पष्ट करण्यात आले. जनतेच्या कल्याणासाठी मिळालेला जनादेश काही लोकप्रतिनिधींनी सत्ता, संपत्ती आणि प्रतिष्ठेसाठी गहाण ठेवल्याचा आरोप संघटनेने केला आहे.

आजच्या राजकारणातील स्वार्थी प्रवृत्तीवर भाष्य करताना संघटनेने म्हटले आहे की, मतदार मला काय मिळेल?, उमेदवार माझी सत्ता कशी वाढेल? आणि राजकीय पक्ष आमचे संख्याबळ कसे टिकेल? या प्रश्नांभोवती राजकारण फिरत आहे. या सर्व प्रश्नांच्या केंद्रस्थानी 'मी' आणि 'आम्ही' असतात; मात्र 'सर्वांचे कल्याण' हा विचार मागे पडतो.

या आत्मकेंद्री आणि व्यवस्थेला पोखरणाऱ्या प्रवृत्तीला संघटनेने 'लोक–कर्क' अशी संज्ञा दिली आहे. अशा प्रवृत्ती लोकशाहीतील विश्वास, सार्वजनिक संसाधने आणि जनतेने दिलेली राजकीय शक्ती स्वतःच्या वाढीसाठी वापरतात, असे संघटनेचे म्हणणे आहे.

महाभारतातील द्रौपदी वस्त्रहरणाचा संदर्भ देत ॲड. गवळी म्हणाले, द्रौपदीचे वस्त्रहरण हा केवळ एका स्त्रीवरील अन्याय नव्हता, तर संपूर्ण व्यवस्थेच्या नैतिक अपयशाचे प्रतीक होता. त्याचप्रमाणे आज जनादेशाचे अपहरण होत असताना अनेक जण मौन बाळगत आहेत. मतदारांनी एका विचारधारेसाठी दिलेले मत दुसऱ्याच राजकीय व्यवहारासाठी वापरणे म्हणजे लोकशाहीचे वस्त्रहरण होय.

अशा राजकीय व्यवहारांची किंमत केवळ मतदारांनाच नव्हे, तर संविधान, सार्वजनिक संस्था, समाजातील दुर्बल घटक आणि भावी पिढ्यांनाही मोजावी लागते, असे त्यांनी नमूद केले.

'राष्ट्रीय भ्रष्टांजली' ही भ्रष्ट मानसिकतेविरोधातील प्रतीकात्मक निषेधांजली आहे.

सत्ता ही सुखभोगाचे साधन नसून जनतेची सेवा करण्याची जबाबदारी आहे, याची जाणीव लोकप्रतिनिधींना करून देणे हा या मोहिमेचा उद्देश असल्याचे ॲड. गवळी यांनी सांगितले.

मतदान केल्यानंतर पुढील पाच वर्षे निष्क्रिय राहणारा मतदारही या प्रक्रियेचा अप्रत्यक्ष भागीदार ठरतो. त्यामुळे लोकशाहीत नागरिकांनी केवळ मतदार म्हणून न राहता लोकशाहीचे सहमालक, जागरूक निरीक्षक आणि नैतिक लेखापरीक्षक म्हणूनही भूमिका बजावली पाहिजे, असे आवाहन संघटनेने केले आहे.

'जनलोक आरोपपत्र' हे सूडाचे हत्यार न बनता आत्मपरीक्षणाचे साधन ठरावे आणि 'राष्ट्रीय भ्रष्टांजली' ही व्यक्तिविरोधी मोहीम न होता भ्रष्ट प्रवृत्तीच्या अंताची घोषणा ठरावी, अशी अपेक्षा संघटनेच्या वतीने व्यक्त करण्यात आली.

जनादेशाशी विश्वासघात करून सत्तेसाठी पक्षांतर करणाऱ्या लोकप्रतिनिधींविरोधात ही जनजागृती मोहीम उभारण्यासाठी ॲड. कारभारी गवळी, अशोक सब्बन, प्रकाश थोरात, ॲड. अमित थोरात, शाहीर कान्हू सुंबे, ॲड. लक्ष्मणराव पोकळे, वीरबहादूर प्रजापती, संतोष खामकर, ओम कदम, पोपट शेळके, धनंजय मडके, कैलास पठारे, ॲड. विद्या शिंदे, राजेंद्र कर्डिले, दिलीप घुले आणि प्रकाश गोसावी प्रयत्नशील असल्याचे सांगण्यात आले.

# आय.एस.डी.टी. संस्थेत १९ ते २१ जून स्वानुभव : २०२६ चे आयोजन

नगर – येथील इन्स्टिट्यूट फॉर स्टडीज इन डिझायन अँड टेक्नॉलॉजी (आय.एस.डी.टी.) या संस्थेच्या फॅशन डिझाईन व इंटिरियर डिझाईनिंगच्या विद्यार्थ्यांच्या कलाकृतींचे वार्षिक प्रदर्शन स्वानुभव:२०२६ चे १९ ते २१ जून या कालावधीत आयोजित करण्यात आले आहे, अशी माहिती संस्थेच्या संचालिका पूजा देशमुख यांनी दिली.




मुंबई येथील एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठाशी संलग्न असलेल्या आय.एस.डी.टी. या संस्थेमार्फत प्रतिवर्षी विद्यार्थ्यांच्या कलाकृतींचे प्रदर्शन आयोजित केले जाते. यावर्षी आयोजित करण्यात आलेल्या प्रदर्शनाचे उद्घाटन १९ जून रोजी दु. ४ वा. उपमहापौर ॲड. धनंजय जाधव यांच्या हस्ते व पुणे येथील फॅशन डिझायनर प्रियांका कामठे तसेच अहिल्यानगर इंटेरियर डिझायनर असोसिएशनचे अध्यक्ष सागर कंदूर यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान आय.एस.डी.टी. चे संस्थापक अध्यक्ष विनायक देशमुख हे भूषविणार आहेत. अशी माहिती संस्थेचे प्राचार्य आर्किटेक्ट अरुण गावडे यांनी दिली.

या प्रदर्शनाबाबत पूजा देशमुख यांनी सांगितले, हे प्रदर्शन सर्वांसाठी विनामूल्य खुले असून फॅशन डिझाईन व इंटेरियर डिझाईन या क्षेत्रात करिअर करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी आणि त्यांच्या पालकांसाठी हे प्रदर्शन विशेष उपयुक्त ठरणार आहे. आय. एस.डी.टी. चे अभ्यासक्रम पूर्ण केल्यावर विद्यार्थी लगेचच अर्थाजन करू शकतात, असा आमचा अनुभव आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांचा आणि पालकांचा या अभ्यासक्रमांकडे दिवसेंदिवस कल वाढत आहे. विशेष म्हणजे इयत्ता दहावी उत्तीर्ण झाल्यानंतर फक्त दोन वर्ष कालावधीच्या या अभ्यासक्रमांच्या माध्यमातून उज्वल भवितव्य घडविण्याची संधी आय.एस.डी.टी. ने विद्यार्थ्यांसाठी अहिल्यानगर येथे उपलब्ध करून दिली आहे.

या प्रदर्शनात फॅशन डिझाईन विभागात विद्यार्थ्यांनी तयार केलेले फ्रॉक्स, पार्टीवेअर, डिझायनर वेअर्स असे विविध कपडे, महिलांसाठी स्कर्टस, टॉप्स, डिझायनर्स आउटफिट्स, हॅन्डमेड ज्वेलरी, हँड पेंटेड दुपट्टा, जॅकेटस, ॲक्सेसरीज, घागरा, रेडीमेड नऊवारी साडी यांचे सादरीकरण करण्यात आले असून या सर्व कलाकृती नगरकरांसाठी अत्यंत माफक दरात विक्रीसाठी उपलब्ध आहेत. आय.एस.डी.टी.ची २०२१ ते २०२३ ची माजी विद्यार्थीनी सायली दिघे हिने नुकतेच सिनेअभिनेत्री सोनाली कुलकर्णी, गिरीजा प्रभू,अंतरा नंदी यांच्यासाठी डिझायनर वेअर्स तयार केले आहेत. अशी माहिती फॅशन डिझायनिंगच्या विभाग प्रमुख पूजा पतंगे यांनी दिली.

इंटिरियर डिझाईन विभागात विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या निवासी व व्यावसायिक डिझाईनचे व प्रकल्पांचे सादरीकरण करण्यात आले आहे, अशी माहिती प्राचार्य आर्किटेक अरुण गावडे यांनी दिली.

स्वानुभव :२०२६ च्या यशस्वीतेसाठी अरुण गावडे व पुजा पतंगे यांच्यासह चेतन वाडेकर, शिरिष गावडे, अमित चिमनानी, प्रणव भोसले, फरहीन शेख, स्मिता बडाख, पूर्वा भंडारी, कोमल वांढेकर, रोहन चारगुंडी हे परिश्रम घेत आहेत.

आय.एस.डी.टी., निर्मल चेंबर्स मागे, हार्मो केअर लॅब समोर, लाल टाकी, अहिल्यानगर येथे १९ रोजी दु. ४ ते ७ या वेळेत व २० व २१ जून रोजी सकाळी १० ते सायं. ७ या वेळेत खुले असणाऱ्या या विनामूल्य प्रदर्शनास विद्यार्थी, पालक, आर्किटेक्ट, इंजिनियर्स, इंटिरियर डिझायनर्स, फॅशन डिझायनर्स, कॉन्ट्रॅक्टर्स व कलारसिक नागरिकांनी भेट द्यावी, असे आवाहन आय.एस.डी.टी. या संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे.

# महा-ई-सेवा पोर्टलच्या तांत्रिक अडचणींमुळे विद्यार्थ्यांची धावपळ

नगर – शैक्षणिक वर्ष २०२६–२७ ची प्रवेश प्रक्रिया सुरू असतानाच, शासनाच्या 'महा–ई–सेवा' पोर्टलवर उद्‌भवणाऱ्या तांत्रिक अडचणींमुळे अहिल्यानगर तालुक्यातील विद्यार्थी व पालकांचे प्रचंड हाल होत आहेत. या समस्येकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी 'रुद्र प्रतिष्ठान'च्या वतीने तहसीलदार स्वप्नील ढवळे यांना निवेदन देण्यात आले.



शासनाचे लक्ष वेधण्यासाठी 'रुद्र प्रतिष्ठान'च्या वतीने तहसीलदार स्वप्नील ढवळे यांना निवेदन देण्यात आले.

सध्या शाळा व महाविद्यालयीन प्रवेशासाठी आवश्यक असलेली विविध कागदपत्रे आणि दाखल्यांसाठी विद्यार्थी व पालकांची मोठी लगबग सुरू आहे. मात्र, महा–ई–सेवा पोर्टलवर वारंवार लॉग–इनच्या समस्या, वेबसाइट न उघडणे आणि माहिती भरताना येणारे तांत्रिक एरर यांसारख्या अडचणींमुळे दाखले वेळेवर मिळत नाहीत. परिणामी, विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होण्याची भीती निर्माण झाली आहे. ही बाब लक्षात घेता रुद्र प्रतिष्ठानच्या पदाधिकाऱ्यांनी तहसीलदार स्वप्नील ढवळे यांची भेट घेऊन त्यांना या अडचणींची माहिती दिली. वेबसाइटच्या तांत्रिक त्रुटी तातडीने दूर करण्याची मागणी त्यांनी निवेदनाद्वारे केली. तहसीलदार ढवळे यांनी या निवेदनाची गांभीर्याने दखल घेत, पुढील दोन दिवसांत पोर्टल सुरळीत करण्याचे आश्वासन दिले आहे.

या वेळी रुद्र प्रतिष्ठानचे अध्यक्ष पै. निखिल शिंदे, युवासेना तालुकाध्यक्ष योगेश धाडगे, प्रणव बेल्हेकर, अमित छत्तिसे, राहुल फाटक, संकेत धोंडे यांच्यासह अनेक विद्यार्थी उपस्थित होते.

# मोहरम काळात वादग्रस्त मजकूर सोशल मीडियावर शेअर केल्यास ॲडमिनवर कायदेशीर कारवाई

नगर – शहरात १७ ते २६ जून या कालावधीत मोहरम उत्सव साजरा केला जाणार आहे. या काळात सोशल मीडियावर कोणताही वादग्रस्त मजकूर शेअर झाल्यास संबंधित ग्रुपच्या ॲडमिनवर कारवाई करण्यात येईल. तसेच इतर माध्यमांवरही पोलिसांचे लक्ष राहणार आहे. दोन समाजात तेढ निर्माण होईल, असा मजकूर शेअर केल्यास संबंधितावर कठोर कारवाई केली जाईल, असा इशारा कोतवाली पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक नितीन देशमुख यांनी दिला आहे.

पोलीस निरीक्षक देशमुख यांनी सोशल मीडिया आणि व्हॉट्सॲप ग्रुप ॲडमिनसाठी एक महत्त्वाचा इशारा देणारी नोटीस जारी केली आहे. भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम १६८ अन्वये ही नोटीस बजावण्यात आली आहे. उत्सवाच्या काळात कोणत्याही प्रकारे शांतता भंग होऊ नये, म्हणून पोलिसांनी ग्रुप प्रमुखांवर मोठी जबाबदारी सोपवली आहे. सोशल मीडियावर दोन गटांत किंवा समाजात तेढ निर्माण होईल, असा कोणताही वादग्रस्त मजकूर, संदेश अथवा छायाचित्रे व्हॉट्सॲप, इंस्टाग्राम आणि फेसबुकवर प्रसारित करू नयेत, असे पोलिसांनी स्पष्ट केले आहे. तसेच, समाजात भीती किंवा गैरसमज पसरवणाऱ्या कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नका आणि त्या पुढे पाठवू नका, अशी सूचनाही करण्यात आली आहे. आपल्या ग्रुपवर येणाऱ्या प्रत्येक संदेशाची पडताळणी करण्याची मुख्य जबाबदारी ही ग्रुप ॲडमिनची असेल. जर कोणी नियमांचे उल्लंघन करून आक्षेपार्ह मजकूर पसरवला, तर त्याला सर्वस्वी ग्रुप ॲडमिन जबाबदार धरले जाईल. या नियमांकडे दुर्लक्ष केल्यास संबंधित व्यक्तीवर प्रचलित कायद्यानुसार कडक कायदेशीर कारवाई केली जाईल. तसेच, ही नोटीस न्यायालयात पुरावा म्हणून सादर केली जाईल, असा इशारा पोलीस निरीक्षक नितीन देशमुख यांनी दिला आहे.

# महावितरणच्या कथित वीज चोरी कारवायांविरोधात जिल्हाधिकारी कार्यालयासमोर केले धरणे आंदोलन

## गोरगरीबांची आर्थिक लूट, धनदांडग्यांना अभय?; ग्रामीण अभियंता व वीज चोरी पथकाच्या खातेनिहाय चौकशीची मागणी

नगर – महावितरण कंपनीकडून वीज चोरीविरोधी कारवाईच्या नावाखाली कथितपणे सेटलमेंट, आर्थिक वसुली आणि गोरगरीब व्यावसायिकांना लक्ष्य केले जात असल्याचा आरोप करत अखिल भारतीय सह्याद्री छावा संघटनेच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात आले. या आंदोलनाद्वारे महावितरणच्या ग्रामीण अभियंता कार्यालयासह संबंधित वीज चोरी पथकाच्या कामकाजाची संपूर्ण खातेनिहाय चौकशी करून दोषींवर गुन्हे दाखल करण्याची मागणी करण्यात आली.



प्रदेश कार्याध्यक्ष रावसाहेब काळे यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या आंदोलनात शिवसेना सामाजिक न्याय विभागाचे जिल्हाध्यक्ष विनोद साळवे यांच्यासह दत्ता वामन, श्रीधर शेलार, विजय वहाडणे, सुभाष काकडे, बबन शिंदे, बाजीराव कलढोणे, राजकुमार पासवान, हरीओम राजपूत, संदीप राजपूत, महेश गुंजकर, राम भोर, अरविंद चौधरी, शंभू यादव, दिनेश यादव, कृष्णा कुमार, चंद्रकांत मगर, कैलास शर्मा, सुधाकर यादव, रवींद्र राजपूत, अरविंद राजपूत आणि कामगार व पदाधिकारी सहभागी झाले होते.

आंदोलनकर्त्यांनी महावितरण कंपनीवर वीज कायद्याचा गैरवापर केल्याचा गंभीर आरोप केला. त्यांच्या म्हणण्यानुसार, काही कर्मचारी आणि अधिकारी यांच्या साखळीमार्फत खाजगी एजंटांच्या माध्यमातून लाखो रुपयांची आर्थिक उलाढाल होत असून वीज चोरीविरोधी मोहिमेचा वापर दबावतंत्र म्हणून केला जात आहे.

संघटनेने आरोप केला की, एप्रिल महिन्यात वीज चोरीविरोधी विशेष पथकाच्या नावाखाली काही ठिकाणी कारवाई करण्यात आली. मात्र या कारवाईबाबत नाशिक विभागाकडून पथक आले असल्याची माहिती पसरवून निवडक आणि मोजक्याच ठिकाणी छापे टाकण्यात आले. यामध्ये यापूर्वी संबंधित यंत्रणेशी आर्थिक व्यवहार किंवा कथित हप्ते सुरू असलेल्या काही जणांना अभय देण्यात आले, तर इतरांवर कठोर कारवाई करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला.

आंदोलनकर्त्यांच्या म्हणण्यानुसार, छोटे व्यावसायिक, हॉटेल चालक आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील व्यावसायिकांना लक्ष्य करून त्यांच्यावर मोठ्या प्रमाणात दंड आकारण्यात आला. तर दुसरीकडे मोठ्या व्यावसायिकांना तुलनेने कमी दंड आकारून त्यांना संरक्षण दिले जात असल्याचा आरोपही संघटनेने केला. महावितरणच्या काही अधिकारी आणि कर्मचाऱ्यांशी कथित तडजोडींच्या माध्यमातून सुरू असलेल्या गैरप्रकारांची सखोल चौकशी होणे आवश्यक असल्याचे संघटनेने म्हटले आहे. वीज चोरीविरोधी कारवाईच्या नावाखाली सुरू असलेल्या कथित गैरव्यवहारांमुळे सर्वसामान्य नागरिक आणि लघु व्यावसायिकांमध्ये असंतोष निर्माण झाला असल्याचे आंदोलनकर्त्यांनी सांगितले. यावेळी जिल्हाधिकारी कार्यालयाकडे देण्यात आलेल्या निवेदनात संबंधित ग्रामीण अभियंता, वीज चोरी प्रतिबंधक पथकातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या कामकाजाची खातेनिहाय चौकशी करण्यात यावी, त्यांच्या आर्थिक व्यवहारांची तपासणी करावी तसेच चौकशीत दोषी आढळणाऱ्यांविरुद्ध तात्काळ फौजदारी गुन्हे दाखल करण्यात यावेत, अशी मागणी करण्यात आली.

# समर्पण चातुर्मासासाठी सकल जैन समाज एकवटला; आनंदधाममध्ये सुरू जय्यत तयारी

## ऐतिहासिक समर्पण चातुर्मासात हजारो भाविकांच्या सहभागाचे नियोजन

नगर – राष्ट्रसंत श्री आनंदऋषीजी म.सा. यांच्या पावन कर्मभूमी असलेल्या आनंदधाम येथे महाराष्ट्र प्रवर्तक श्री कुंदनऋषीजी म.सा. यांच्या सानिध्यात तसेच प्रबुद्ध विचारक श्री आदर्शऋषीजी म.सा. यांच्या सहयोगाने उपाध्याय प्रवर श्री प्रवीणऋषीजी म.सा. आदी ठाणा–२ यांचा यंदाचा वर्ष २०२६ चा समर्पण – सर्व कल्याण चातुर्मास भव्य आणि ऐतिहासिक स्वरूपात होणार आहे. समर्पण चातुर्मासाच्या पूर्वतयारीसाठी आयोजित नियोजन बैठकीत सकल जैन समाजातील विविध संघटना, श्रावक संघ, युवक मंडळे, महिला मंडळ आणि समाजबांधवांचा सहभाग लाभला.



आनंदधाम येथे उत्साहात पार पडलेल्या या बैठकीचा प्रारंभ सामूहिक नवकार महामंत्र पठण व 'ॐ आनंद नमो नमः'च्या घोषणांनी झाला. प्रारंभी अनिल पोखरणा यांनी उपस्थितांचे स्वागत केले.

यावेळी बोलताना समर्पण चातुर्मास समितीचे अध्यक्ष अशोक (बाबूशेठ) बोरा यांनी सांगितले की, यंदाचा चातुर्मास हा केवळ धार्मिक कार्यक्रम नसून संपूर्ण समाजाला एकत्र आणणारा आध्यात्मिक महोत्सव ठरणार आहे. १९८७ मध्ये आचार्य सम्राट आनंदऋषीजी म.सा. यांच्या दीक्षा अमृत महोत्सवाचे तसेच २००९ मध्ये प्रवीणऋषीजी म.सा. यांच्या चातुर्मासाचे नियोजन करण्याचे भाग्य लाभले होते. यंदाही या शिखर चातुर्मासाचे नेतृत्व करण्याची संधी मिळणे हे माझ्यासाठी परमभाग्य असून हा चातुर्मास सुवर्णाक्षरांनी लिहिला जाईल, असा विश्वास आहे.

यावेळी प्रमुख लाभार्थी म्हणून सौरभ, पराग बोरा व श्रीमती प्रमिलाबाई हेमराज बोरा यांचा उल्लेख करण्यात आला. सौरभ बोरा यांच्यामार्फत भोजन व्यवस्था, मंडप व्यवस्था तसेच ३००० आठाई तपस्वींना मौल्यवान आकर्षक भेट देण्यासह विविध सुविधा उपलब्ध करून दिल्या जाणार असल्याची माहिती देण्यात आली.

देशभरातून मोठ्या संख्येने भाविक अहिल्यानगरात दाखल होणार असल्याने त्यांच्या निवास, भोजन व इतर सोयींसाठी व्यापक नियोजन करण्यात आले आहे. यासाठी बडीसाजन मंगल कार्यालय, केशर गुलाब मंगल कार्यालय, इंद्रप्रस्थ मंगल कार्यालय तसेच पटेलवाडी यांचे सहकार्य लाभत असल्याचे सांगण्यात आले.

समर्पण चातुर्मास समितीचे महामंत्री आदेश चंगेडिया यांनी समाजबांधवांना आवाहन करताना सांगितले की, हा चातुर्मास समर्पण, साधना आणि सर्वांच्या कल्याणाचा महोत्सव आहे. प्रत्येक समाजबांधव आणि भगिनींनी सेवाभावाने यात सहभागी व्हावे. त्यांनी पुढे माहिती दिली की, २५ जून रोजी प्रवीणऋषीजी म.सा. यांचे अहिल्यानगर शहरात मंगल प्रवेश होणार असून २५ जून ते २५ जुलै या कालावधीत शहर व उपनगरातील विविध स्थानक, कॉलनी आणि श्रावक संघांमध्ये त्यांचे विचारण आयोजित करण्यात आले आहे.

२६ जुलै रोजी विनायकनगर येथील बोरा फार्म येथे ३००० जोडप्यांचे विराट सजोडे भक्तामर अनुष्ठान आयोजित करण्यात आले असून त्यानंतर विनायकनगर ते आनंदधाम असा शोभायात्रेसह चातुर्मास प्रवेश सोहळा होणार आहे.

चातुर्मास यशस्वी करण्यासाठी नवकार तीर्थ अनुष्ठान समिती, आवास–निवास समिती, वाहतूक व्यवस्था समिती, आनंद सप्ताह समिती, मंडप समिती, भोजन समिती, शिबिर व्यवस्था समिती आदी विविध समित्यांची स्थापना करण्यात आली आहे. समाजबांधवांना त्यांच्या आवडीनुसार सेवा कार्यात सहभागी होता यावे यासाठी विशेष मोबाईल ॲप विकसित करण्यात आले असून क्यूआर कोडद्वारे ऑनलाइन नोंदणीची सुविधाही उपलब्ध करून देण्यात आली आहे.

तसेच चातुर्मास काळातील विविध कार्यक्रम, शिबिरे व उपक्रमांची अद्ययावत माहिती भक्तांपर्यंत पोहोचविण्यासाठी व्हॉट्सप चॅनेल, फेसबुक व इन्स्टाग्राम पेज सुरू करण्यात आले असून प्रवीणऋषीजी म.सा. यांची दैनिक प्रवचने यूट्यूबवर थेट प्रक्षेपित केली जाणार आहेत.

नगरसेवक संजय चोपडा यांनी महानगरपालिकेशी संबंधित सर्व आवश्यक कामांसाठी महावीर चषक परिवारामार्फत सेवाभावी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. भाविकांसाठी विशेष बससेवाही उपलब्ध करून दिली जाईल, असे त्यांनी सांगितले.

राजेश भंडारी यांनी नव्या पिढीने धर्मकार्यात पुढाकार घेण्याची आवश्यकता अधोरेखित केली. युवकांनी चातुर्मास सेवेत सहभागी व्हावे, असे आवाहन त्यांनी केले.

विलास कटारिया यांनी आवास–निवास समितीच्या नियोजनाची माहिती दिली, तर स्वप्ना विलास कटारिया यांनी विविध वयोगटांसाठी आयोजित निवासी व अनिवासी शिबिरांची रूपरेषा मांडली.

जय आनंद महावीर युवक मंडळाचे अध्यक्ष शैलेश मुनोत यांनी नवविवाहितांसाठी गुरुदेवांच्या मार्गदर्शनाखाली विशेष जीवनमूल्य शिबिर आयोजित करण्यात येणार असल्याची माहिती दिली.

केडगाव, भूषणनगर, विनायकनगर, आगरकर मळा, सारसनगर, भिंगार, नागापूर, सावेडी, महावीरनगर, सिव्हिल हडको, आदी उपनगरांतील जैन स्थानकांचे पदाधिकारी उपस्थित होते. सर्वांनी चातुर्मास सेवेत सक्रिय सहभाग नोंदविण्याची ग्वाही दिली.

बैठकीस समर्पण चातुर्मास समितीचे अशोक बोरा, आदेश चंगेडिया, विलास कटारिया, अनिल पोखरणा, मनसुखलाल गुंदेचा, राजेश भंडारी, विजय गुगळे, विनोद कटारिया, अभय गांधी, सुरेश कांकरिया, राजकुमार बोरा, सचिन देसर्डा, अभिजित गांधी यांच्यासह विविध सामाजिक, धार्मिक व युवक संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते. बैठकीची सांगता सचिन देसर्डा यांनी मानलेल्या आभार प्रदर्शनाने झाली.

